भूप्रवास २४ स. १८८५

ले. गोविंदराव नानाजी जोशी

# रायगड किल्ल्याचे वर्णन.

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

२४

सं. क्र.

रायगड किल्ल्याचे वर्णन

(भू-प्रवास)

ग्रंथ संग्रहालय ठाणे

# प्रस्तावना.

अलिकडे वर्तमानपत्रांतून श्रीछत्रपती शिवाजी महाराजांचे समाधीची व ज्या शिवलिंगाची महाराज नित्य पुजा करीत असत, त्याची अव्यवस्था झाल्याविषयीं वारंवार लेख येत असत, ते वाचून मनास अतिशय दुःख होई कीं, ज्या महापुरुषानें आम्हां हिंदूंकरितां अनेक श्रम केले. अनेक संकटें भोगिलीं. आणि स्वराज्य स्थापन केलें. त्या परम प्रतापी शिवाजी महाराजांचे समाधीची ही अशी दशा ऐकून आम्हीं स्वस्थ बसावेना ! धिक् आमचें जिणें. असें वारंवार वाटे. शेवटीं असें योजिलें कीं, आपण एकवार रायगडावर जाऊन डोळ्यांनीं तेथील सर्व स्थिति पाहून यावी, आणि नंतर त्या संबंधानें हकीगतीचें लहानसें पुस्तक लिहून, राजे रजवाडे व पुढारी मंडळी यांजकडे पाठवावें. असें मनांत आणून तारिख २० माहे मार्च सन १८८५ रोजीं बडोदें सोडून तारीख ३ माहे एप्रील सन १८८५ रोजीं रायगडावर दाखल झालों. नंतर तेथें जें कांहीं मीं पाहिलें व रायगड संबंधानें ज्या कितीएक दंतकथा समजल्या व जुन्यापुस्तकांतून माहिती मिळाली ती यांत लिहून हें लहानसें पुस्तक तुम्हां सर्वांपुढें ठेविलें आहे.

बडोदें
ता. १ जून
सन १८८५

आपला अकिंचन सेवक
गोविंदराव बाबाजी जोशी.
वसईकर.

२६१७ २२

# सूचना-

कोणतेही एखादे क्षेत्रीं किंवा तीर्थी आपण गेलों असतां तेथील प्रसादिक वस्तू मोठे सन्मानानें बरोबर आणतों. यांतील हेतु असा असतो कीं तें जें मोठें क्षेत्र किंवा तीर्थ आपण पाहिलें असतें. तेथील कांहीं पदार्थ किंवा वस्तु आपल्या संग्रहीं सतत असल्या ह्मणजे तेणेंकरून आपणास त्या स्थळाचें वारंवार स्मरण राहतें. आणि त्यायोगें त्या स्थल महात्माप्रमाणें चित्तशुद्धि होत जाते या उद्देशानें आपण त्या वस्तूचा मोठें सन्मान बुद्धीनें संग्रह करितों. त्याप्रमाणें क्षात्र धर्म संस्थापक जें रायगड क्षेत्र कीं ज्या क्षेत्रीं धारातीर्थांत स्नानें करून अखंड वास करीत असलेले आमचे पूर्वज पूर्वी रहात होते शिवाय ज्या स्थळीं परम प्रतापी शिवाजी महाराज समाविस्थ झाले. त्या क्षेत्राचे किर्तीचें वर्णन करण्यास व त्याचा महिमा गाण्यास यापेक्षां त्या दुसऱ्या कोणत्या मोठ्या गोष्टी पाहिजेत. असें जें तें महा क्षेत्र तेथें मी गेलों होतों. अशा पवित्र स्थळीं मी गेल्यावर तेथें ज्या मला प्रसादिक वस्तू दिसल्या त्या मी बरोबर तुह्मां सर्वांपुढें ठेवण्याकरितां आणल्या आहेत. त्या वस्तु येणेंप्रमाणें.

१ ज्या गंगासागर तलावांत श्रीछत्रपती शिवाजी महाराज दररोज स्नान करीत असत व देवाचे पुजेंत जें उदक नित्य घेत असत. त्या तलावांतील तीर्थ (उदक)

२ ज्या धान्याचे कोठींतील अन्न महाराज व त्यांचे

सर्व सरदार, शिपाई, वगैरे दररोज सेवन करीत असत त्या कोठींत सांपडलेले जुनें तांदूळ.

३. ज्या शिवछत्रपती महाराजांनीं रामायण भारत यांत वर्णिलेल्या महायोध्याप्रमाणें क्षात्रधर्म पाळिला. त्या महापुरुषाचें देहावसान जेथें झालें त्या स्थळाचे समाधींतील भस्म (रक्षा).

येणेंप्रमाणें वस्तू मी आपल्या बरोबर आणिल्या आहेत व या वस्तूस प्रत्येकानें आपले संग्रहीं ठेवणें मोठे अगत्याचें आहे व तें आमचें कर्तव्य आहे कीं नाहीं ? आपले चांगलें ध्यानांत येईल.

# रायगड किल्ला पाहण्यास मार्ग.

मुंबईहून सकाळीं सात वाजतां भाऊचे धक्क्यावरून मलबारकडे जाणाऱ्या फेरीआगबोटींत बसलें असतां दोनप्रहरां नंतर सुमारें ३ वाजतां दिवसां बाणकोट मुक्कामीं आगबोट पोहोंचते. तेथें जाऊन उतरावें. तेथें मुसलमान लोकांची मुख्य वस्ती असल्यामुळें हिंदू लोकांस उतरण्या कारितां केळसी येथील प्रसिद्ध गृहस्थ उपनांव केळकर यांनीं एक मोठा वाडा बांधून ठेविला आहे. त्या वाड्यांत वस्ती करून नंतर दुसरे दिवशीं किंवा त्याच दिवशीं भरतीच्या सोईप्रमाणें दास गांवास जाण्याकारितां दुसरी लहान आगबोट निघते. तींत बसून दासगांवास उतरावें. तेथून महाडा पर्यंत तीन कोस सडकेचा रस्ता आहे. त्यानें महाडास (महाडगांव अलीबाग जिल्ह्यांत आहे.) गेल्यावर तेथें गाडी व दोन मजूर करून दुसरे दिवशीं लौकर भोजन करून बरोबर थोडासा शिधा व फराळाचें घेऊन रायगडाकडे जाण्याकारितां निघावें; तों पांचाड

---

*रायगडकिल्ला पाहण्यास घाटावरून पुणें, सातारा वगैरे ठिकाणाहून जावयाचें असल्यास त्याची माहिती खालीं लिहिल्याप्रमाणें:—

गांव ज्या डोंगरावर वसला आहे त्या डोंगराचे पायथ्या पर्यंत जावें. तेथें गाडी सोडून डोंगर चढण्यास लागावें. येथून सुमारें दोन मैल चढाव चढून गेल्यावर पांचाड गांव लागतो. या गांवीं वस्तीस रहावें. हा गांव खोतीचा आहे. या गांवीं हरीत्रा कारभारी म्हणून एक चांगला हुशार मराठा राहतो. त्याचे मार्फतीनें पांच चार मजूर वगैरे बरोबर घेण्याकरितां पाहून रात्रीसच तयारी करून ठेवावी. आणि दुसरे दिवशीं पहाटेस रायगडचा डोंगर चढण्यास लागावें. ( ही चढण बरीच कठीण व श्रमसाध्य आहे. ) सावका-

---

महाबळेश्वर ( मालकमपेठ ) येथें हरएक ठिकाणाहून कसें जावें याची माहिती देण्याची येथें गरज नाहीं. कारण ते रस्ते प्रसिद्धच आहेत. याजकरितां महाबळेश्वराहून रायगडकिल्ल्यावर जाण्याचा जो रस्ता आहे, त्याची माहिती दिली ह्मणजे झाले.

महाबळेश्वर ( मालकमपेठ ) येथून निघालें ह्मणजे पहिला मुक्काम वाड्यावर घाटाचे खाली करावा, तेथून निघालें ह्मणजे दुसरा मुक्काम, पोलादपूर येथें करावा, पोलादपुरापासून तिसरा मुक्काम महाडास करावा, महाडापासून रायगडकिल्ल्याचा डोंगर सुमारें आठ मैल लांब आहे, डोंगराचे कडसरीस ( पांचाड ) गांव आहे, तेथें मुक्कामास जावें, व्यवस्था खालीं दिलीच आहे.

* मीं आपले बरोबर डोली घेतली होती. परंतु रस्ता सोईचा नसल्यामुळें तिचा उपयोग झाला नाहीं.

शीनें जरी चाललें व वाटेंत दोन तीन ठिकाणीं दहा पांच मिनिटें विश्रांति घेतली तरी किल्ल्याचे महा दरवाजास पोंचण्यास सुमारें ११ वाजतात. नंतर तसेंच गंगासागर तलावाकडे जावें. तेथें नजीकचे मनोऱ्यांत किंवा तळ्याचे कांठीं झाडाखालीं भोजन किंवा फराळ वगैरे करणें असेल तर करून सर्व स्थळें पाहण्यास लागावें. तें संध्याकाळचे ५ वाजेपर्यंत हिंडावें. याप्रमाणें सर्व पहाणें पुरें झाल्यावर (वस्तीस रायगडावर राहिल्यास हरकत नाहीं. परंतु पांच चार सोबती असावे, व पांघरुणाची मजबुती असावी.) नंतर वस्तीस पांचाडगावीं यावें, किंवा महाडाकडे न येतां परभारे नागोठण्यावरून परत येण्याचा विचार असला तर 'वाडी' गांवीं वस्तीस यावें. हा वाडी गांव जे वेळेस रायगड चांगल्या स्थितींत होता, ते वेळेस मोठे भरभराटीचा होता. या गांवीं त्या वेळापासून वसत आलेल्या कित्येक सोनारांचीं घरें आहेत. या सोनारांपैकीं एक दोन असामी किल्ल्यावरील माहिती सांगण्यांत व स्थळें दाखविण्यांत मोठे कुशल आहेत, व त्यांस बऱ्याच दंतकथाही माहीत आहेत. त्या दंतकथा जरी कित्येक अतिशयोक्तीच्या आहेत; तरी त्या ऐकून मनाला एकप्रकारचा आनंद व उल्हास प्राप्त ×होतो. या वाडी-

---

* किल्ला पहाण्यास सोईचे दिवस फाल्गुन, चैत्र, वैशाख महिन्यांतील पौर्णिमेनजिकचे होत.

× रायगड पहाण्यास जाणारांनीं यांजपैकीं एकास ब-

गांवीं दोन परीट रहातात, त्यांचे पूर्वज शिवाजी महाराजांचे कपडे धुणारे होते, असें सांगतात. व ते त्या वेळापासून हल्लीं पर्यंत तेथेंच राहिले आहेत.

---

## रायगड किल्ल्याविषयींची जुनी हकीगत.

सह्याद्रीपर्वताचे ज्या शिखरावर हा रायगड किल्ला बांधला आहे. त्या डोंगराची स्वभावसिद्ध रचना अशी आहे कीं, कितीही हुशार शत्रु असला, तरी प्रसिद्ध रस्त्याशिवाय अन्य रितीनें तो जर वर जाऊं म्हणेल तर त्यास जातां यावयाचें नाहीं. या किल्ल्याची विस्तीर्णता व तशीच कोंकण, आणि घांट यांत सारखा संबंध ठेवण्याविषयीं सुलभता व श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे ताब्यांत जे एकंदर किल्ले त्याकाळीं होते त्यांत हा मध्यभागीं असा असल्या- मुळें महाराजांनीं आपली गादी रायगडीं स्थापन केली असावी असें अनुमान आहे.

बाराव्या शतकांत रायगड ( रायरी किल्ला. ) हा एके लहानशा पाळेगाराचे ताब्यांत होता. पुढें चौदावे शतकांत

---

रोबर जरूर ठेवावें त्या योगें चांगली मदत होते. आम्ही आपले बरोबर 'पांचाड' गांवचे मुजावरास घेतलें होतें. तोही चांगला माहितगार आहे.

या पाळेगारास अनागोंदी ह्मणजे विजयानगर* येथील राजानें आपले सत्तेखालीं घेतलें. तेव्हांपासून तो त्यांचे ताब्यांत गेला. पुढें पधरावे शतकांत ह्मणजे सन १४३६ सांत अल्लाउद्दीनशहा बहावी यानीं हा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. तो पुढें सन १४७९ शांत अहंमदनगर सुभ्याचे ताब्यांत गेला. त्या नंतर सन १६३६ सांत अहंमदनगरेच ताब्यांतून अदीलशाई बादशहा विजापूरचा यांनीं घेऊन सिध्धीजोहार जंजी-×ऱ्याचा नबाब याचे ताब्यांत तो दिला. या नंतर श्री-छत्रपती शिवाजी महाराजांचें शौर्य जसजसें उदय पावत गेलें. तसतसें त्यांनीं जंजीऱ्याचे नबाबाचे ताब्यांतील रायगड, तळें, घोंसाळें, वगैरे किल्ले आपल्या ताब्यांत घेतले. पुढें सन १६६२ ष्टांत महाराजांनीं त्याचें जुनें नांव ( रायरी. ) बदलून रायगड, असें नवें नांव ठेविलें. तें हल्लींपर्यंत चालू आहे. त्यानंतर रायगडीं गादी स्थापण्याचें जे समयीं महाराजांचे मनांत आलें तेसमयीं, आबाजी सोनदेव कल्याणचा सुभेदार यांस रायगडावर बोलावून आणून राजवाडा तसेंच इतर मुत्सद्दी यांस राहण्यास व आठरा कारखाने यांची सोय होईल अशा प्रकारचीं घरें, व वाडे, बांधून सर्व व्यवस्था

---

* विजयानगर सांप्रत मद्रासइलाख्यांत आहे.

× जंजीरा रायगडचे पश्चिमेस समुद्रकांठीं मोठा मजबूत किल्ला आहे. तो तेथील नबाबाकडे असून मुलूख चालू आहे. यास हबशी असेंही ह्मणतात.

करण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें राजवाड्यासुद्धां एकंदर ३०० घरें आवाजी सोनदेव यानीं बांधिलीं. या कामास तीन वर्षें लागलीं. आणि हीं सर्व घरें राहण्यास सोईचीं आणि शत्रूच्या येण्याच्या ज्या ज्या घाटा होत्या त्यांचा योग्य रितीनें बंदोबस्त राही व देखरेख होई अशा प्रकारें बांधिलीं होतीं. किल्ल्यांतून बाहेर पडण्याच्या कांहीं चोरवाटा अशा केल्या होत्या कीं, त्या एसाजीकंक किंवा तानाजी मालुसऱ्या सारख्या परमविश्वासु मावळ्यांस मात्र माहीत; इतरांस त्यांचा थांग मुळींच लागावयाचा नाहीं. अशा प्रकारें किल्ल्याचा बंदोबस्त केल्यानंतर शिवाजी महाराजांनीं एके दिवशीं आवाजी सोनदेव यानीं केलेला बंदोबस्त कसा काय झाला आहे, हें पहाण्याकरितां सभा भरविली. आणि सभेच्या मध्यभागीं सोन्याच्या नाण्यांनीं भरलेली लहानशी थैली; आणि गळ्यांत घालण्याचा सरीसारखा एक दागीना अशीं दोन इनामें ठेऊन सर्वांस सांगितलें कीं, जो कोणी प्रसिद्ध रस्त्याशिवाय किल्ल्यावर चढून येईल त्यास हें ठेविलेलें इनाम देईन. तेव्हां दूर उभा राहिलेला एक महार पुढें आला, आणि जोहार करून ह्मणाला- कीं, "छत्र्याची आज्ञा असेल तर मी यत्न करून पहातों आज्ञा असावी." महाराजांनीं तत्काळ अज्ञा दिली. सर्वांसमक्ष तो खालीं जाऊन अनेक यत्नांनीं एके कड्यावरून युक्तीनें शेवटीं वर चढून आला. तेव्हां महाराज आश्चर्य पावून त्यास शाबासकी दिली. आणि

नेमलेलें इनाम दिलें. नंतर तो ज्या वाटेनें वर आला होता ती वाट मजबूत रितीनें बंद करून टाकली.

## महाराजांची थोडीशी कारकीर्द.

सन १६६४ सालीं शिवाजी महाराजांनीं सुरत शहरावर मोहीम करून पुष्कळ द्रव्य आणिलें. याच सालीं पुढें महाराजांनीं आपल्या नांवास राजा हें पद जोडलें.

सन १६६६ ष्टांत जयपूरचा राजा जयसिंग ज्यास सवाई जयसिंग असें ह्मणतात. तो शिवाजी महाराजांशीं लढण्यास आला असतां महाराजांनीं त्यास निरोप पाठविला कीं, "आपण हिंदू अहां, याजकरितां आपल्याशीं मी लढत नाहीं. तुह्मीं आह्मीं एक धर्मांतील, एक राष्ट्रांतील आहों तेव्हां तुह्माशीं लढणें शास्त्राप्रमाणें पाप आहे. मी तें करीत नाहीं" जयसिंगानें बादशहाचे हुकुमाप्रमाणें लढाईची सर्व तयारी करून आपलें सैन्य समरंगणीं उभें करून शेवटचा निरोपही पाठविला. शेवटीं निरूपाय होऊन महाराज तह करण्यास तयार झाले. नंतर जयसिंगाचे सांगी प्रमाणें त्यानीं आपल्यास अवरंगजेबाचे ताब्यांतील सरदार असें ह्मणवून घेतलें.

जयसिंगा मार्फत अवरंगजेबास पत्र पाठविलें कीं, "मीं जें राज्य संपादन केलें आहे. तें आपलें आहे. मीं आपल्यास दिल्लीचे तक्ताचा नोकर असें आजपासून ह्मणवून घेतों." त्यावेळेस महाराजांचे ताब्यांत पुष्कळ मुलूख व मोठमोठाले एकंदर १४ किल्ले होते. याच सालीं पुढें दिल्ली दरबाराकडून महाराजास दिल्लीस येण्याविषयीं मोठें सन्मानाचें अमंत्रण पत्र आलें. या पत्रांत अवरंगजेबानें विश्वासपूर्वक असें लिहिलें होतें कीं, "तुह्मीं मनांत अगदीं संशय आणूं नये. आह्मीं इमानानें सांगतों कीं, तुह्मास परत जाण्यास इकडून बिलकूल हरकत होणार नाहीं. आपल्या फरजंदे साहेबांसही बरोबर अवश्य आणावें." असें लिहून, शिवाय पहिले प्रतीचा पोपाख महाराजांस पाठविला होता. ह्मणून महाराजांनीं त्याप्रमाणें दिल्लीस जाण्याची तयारी केली. मुख्यमुख्य विश्वासू अधिकाऱ्यांस रायगडावर बोलावून त्यांजकडे सर्व व्यवस्था सांगितली. मोरोत्रिंबकपिंगळे, आबाजीसोनदेव, आणि आण्णादत्तु, यांजकडे सर्व राज्याचा कारभार दिल्लीहून परत येईपर्यंत सोंपाविला. नंतर प्रतापगडावर भवानीचे दर्शनास गेले. श्रीसमर्थ रामदास स्वामींचीं आज्ञा मागितली. असें प्रकारें तयारी करून चैत्र शुध्द ९ शके १५८८ या दिवशीं युवराज संभाजी महाराजांस

* संभाजीचे मातोश्रीचें नांव सईबाई ही नेवासकर विठोजी मोहिते यांची कन्या.

बरोबर घेऊन मातोश्री जिजाबाई यांचे पायांवर साष्टांग नमस्कार घालून प्रातःकाळीं सुमुहूर्तानें महाराज निघाले. ते कुच दरकूच करीत दिल्ली शहरीं जाऊन पोहोंचले, आणि अवरंगजेब बादशाहास दाखल झाल्याची खबर कळविली. ही खबर ऐकून बादशहा फारच खुषी झाला. आपलें कार्य पूर्णपणें शेवटास गेलें असें तो मनांत समजला. दुसरे दिवशीं दरबारांत महाराजांचे भेटीचा निश्चय ठरला. दक्षिणेंतून अवरंगजेब बादशहाकरितां चमत्कारिक चमत्कारिक नजर नजराणे महाराजांनीं बरोबर नेले होते. ते सर्व घेऊन महाराज बादशाहाचे दरबारांत गेले. प्रथम आपण व युवराज संभाजी महाराजांनीं अवरंगजेबास मोठ्या अदबीनें मुजरा केला, तक्ता पुढें नजर नजराणे ठेविले. अवरंगजेबानें या वेळीं महाराजांकडे पाहिलें सुद्धां नाहीं! इतकेंच नाहीं, तर महाराजांस त्यांचे योग्यतेप्रमाणें मोठमोठे सरदारांत न बसवितां साधारण मानकरी मंडळींत बसविलें. हा आपमानाचा प्रकार पाहून महाराज आतिशय खिन्न झाले. तो दिल्लीचा दरबार म्हणजे सर्व हिंदुस्थानची मुख्य गादी! तशांत अवरंगजेबासारखा कपटी व दीर्घद्वेषी बादशहा! दिल्लीपासून रायगड ( स्वतःचें घर. ) दोन महिन्यांची वाट, इतके लांबीचा पल्ला! असा जरी सर्व प्रकार होता; तरी महाराजांस तो अपमान अगदीं सहन झाला नाहीं. पंतांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, ( उष्टें हंस न खाती जरी आला काळ हा

विपत्यांतें.) ही उक्ति कांहीं खोटी नाहीं. शुद्ध बीजाचा महिमाच असा आहे. जें बावनकसी सोनें असतें तें अगदीं धुळींत पडलें तरी त्याचें तेज कधीं लपावयाचें नाहीं. त्याप्रमाणेंच महाराजांनीं वर्तन केलें. शिवाजी महाराजांनीं भर दरबारांत प्रसंगास योग्य असें उद्गार काढून अशा वर्तणुकीनें माझा अपमान होतो, असें दर्शविलें. परंतु, अवरंजेबानें पहिल्या प्रमाणेंच हेही ऐकलें न ऐकलेंसें केलें. असो, पुढें दरबार खलास झाला. महाराज आपल्या मुक्कामास परत आले, तों आरबांचा खडा पहारा महाराजांचे मुक्कामाभोंवतीं येऊन बसला! शिव शिव!!! अशा वेळीं महाराजांचे मनाची काय स्थिति झाली असेल बरें? याचा वाचकांनींच विचार करावा! पण जे खरे शूर असतात ते कसाही प्रसंग आला तरी डगमगत नाहींत. त्या प्रमाणेंच महाराज स्थीरचित्तानें कांहींवेळ एकांतीं जाऊन बसले. आदिमाता कुलस्वामिनीचें ध्यान करून मोठ्या स्वरानें म्हणाले कीं, "माझी ती प्रतापगडची भवानी माझे पाठीशीं आहे. तेव्हां मजला कशाची भीति आहे? तीच या संकटांतून मला पार पाडील" असा महाराजांनीं तिजवर भाव ठेविला. पुढें या भयंकर प्रसंगांतून त्या श्रीजगदंबेनेंच महाराजांची सुटका केली. "वांकड्या मेढीस वांकडा दर लागतो." अशी जी कोंकणी म्हण आहे. त्या प्रमाणेंच महाराजांनीं अवरंगजेबाचे हातांवर तुरी देण्याचा

निश्चय करून आपली दिल्लीशहरांतून सुटका करून घेतली. ( याविषयींची सर्व हकीगत इतिहासांतून प्रसिद्ध आहे. म्हणून येथें लिहीत नाहीं.) असो, अशा प्रकारें मोठे करतबगारीनें आपली व पुत्राची सुटका करून घेऊन शहराबाहेर पडल्यावर साधूचा वेष महाराजांनीं धारण केला. अंगावर भगवीं वस्त्रें परिधान करून दाढी मिशा काढून टाकल्या व " स्वदेशाभिमान " हाच एक ईश्वर त्याचें मनांत स्मरण करीत करीत उन्हाळा, पावसाळा, सर्व डोकीवर सहन केला. कोठें धर्मशाळेच्या कोंपऱ्यांत मुक्काम ! तर कोठें झाडाखालीं धुळींत वस्ती ! अशा स्थितींत अनेक कष्ट सोशीत रायगड सोडल्यापासून नऊ महिन्यांनीं, मार्गशीर्ष महिन्यांत रायगडीं येऊन महाराज दाखल झाले. आणि प्रथम मातोश्री जिजाबाई साहेब यांचे महालांत जाऊन त्यांच्या पायांवर साष्टांगनमस्कार घातला. यासमयीं ती वीरमाता आपल्या पुत्राचे सुटकेकरितां ईश्वराचे भजनांत अगदीं निमग्न झाली होती; याजमुळें जिजाबाईसाहेबांनीं महाराजांस कांहीं ओळखिलें नाहीं. त्यांस चमत्कार वाटला कीं, हे साधु पुरुष एकदम आंत येऊन माझे पायांवर डोकी ठेविली. यांत आहे तरी काय? जिजाबाई ह्मणाल्या " हे साधुपुरुषा तुह्मांस कांहीं धन दौलत पाहिजे असेल तर मागा मीं देईन. पण माझ्या पाया पडूं नका. यांत आह्मास दोष लागतो; कारण आह्मीं साधुचे चरणीं लागावें. त्याचे उलट आपण हें

काय करितां " महाराज ह्मणाले " आईग ? मला तूं ओळखिलें नाहींस काय? अग मी तुझा शिव्या आहे बरें!! हा पहा?" असें ह्मणून डोकीचा तो भगवा रुमाल काढून पुनः महाराजानीं आईच्या पायांवर डोकी ठेविली. तेव्हां महाराजांची पाठ थोपटून मोठ्या स्वरानें जिजाबाई ह्मणाल्या कीं, " अरे, गोब्राह्मण प्रतिपालक माझा शिवबा कांरे तूं!!!" असें ह्मणून मातोश्रीनें पुत्रास ओळाखून पोटाशीं धरलें! त्या वेळेस त्या मायलेंकरांस किती आनंद झाला, त्याचें वर्णन येथें शद्बानें करितां येत नाहीं. त्याचा विचार वाचकांनींच करावा. त्यासमयीं जिजाबाईचे डोळ्यांस अश्रुधारा लोटल्या त्या कांहीं केल्या अटपतना, महाराजांनीं पुष्कळ प्रकारें समाधान केलें, तरी आईचें रडें आंवरेना. शेवटीं महाराजांनीं आपलें डोकें आईचे पोटांत घालून हालविलें, आणि बालपणच्या लडिवाळपणानें तिचें शांतवन केलें. नंतर रायगड सोडल्यापासून* ज्या ज्या गोष्टी घड-

---

*महाराज दिल्लीस गेले. ते समयीं बरोबर एक हजार स्वार, पांचशें पायदळ इतकें सैन्य घेतलें होतें. युवराज संभाजी महाराज व आपले तैनातीची मिळून खासगी पैशाचीं एकंदर पन्नास मनुष्यें मात्र घेतलीं होतीं. ( अलीकडे सन १८७७ सालीं दिल्ली येथें दरबार झाला. हिंदुस्थानचे सर्व राजे रजवाडे आज्ञांकितपणाच्या सनदा घेण्याकरितां तेथें गेले होते. त्यासमयीं लष्कर बरोबर

त्या व दिल्लींत गेल्यावर मोंगलानें कसा विश्वासघात केला, त्यांचे प्रतिबंधांतून किती अडचणीनें सुटका करून घेतली, वाटेंतून येतांना कशीं दुःखें सोसावीं लागलीं, हें सर्व अनुक्रमें निवेदन केलें. या एकंदर हकीगतींत संभूला बरोबर आणिलें नाहीं, हें ऐकून जिजाबाई पुनः दुःखसागरांत बुडाल्या. संभूची मातोश्री सईबाई त्याचे लहानपणींच स्वर्गवासी झाली होती यामुळें तेव्हांपासून पोटच्या लेंकराप्रमाणें जिजाबाईनीं त्यास वाढविलें होतें; त्यायोगें त्याच्या त्या लहानपणच्या लडिवाळ बोलाचें व सर्व खेळाचें जिजा-

---

नेण्यांत जरी ते राजे परतंत्र होते. तरी खाजगी मनुष्यास बरोबर नेण्याविषयीं ते अगदीं आपल्या मर्जीप्रमाणें स्वतंत्र होते. तेव्हां या संबंधानें श्रीछत्रपती शिवाजी महाराजाशीं त्या राजांस आपली तुलना करण्यास व त्याजवरून ऐषआरामांत त्या महापुरुषापेक्षां आपण मागें आहोंत कीं पुढें आहोंत याचा मुकाबला पहाण्यांत हा खाजगी पैशाचा आंकडा फार उपयोगी आहे. म्हणूनच तो येथें दिला आहे. ) महाराजांचे मुक्कामाभोंवतालीं पहारा बसल्यावर इतर माणसें सिधा सामोग्री व दुसरे हरएक कामाच्या संबंधानें बाहेर जाऊं येऊं सकत असत. त्याप्रमाणें कांहीं माणसें बाहेर पाठवून महाराजानीं सर्व व्यवस्था करून ठेविली होती. आणखी या वेळीं महाराजानीं अवरंगजेबास अशी विनंती केली कीं, माझी लष्कराचीं माणसें खर्च खात येथें

बाईस मोठें कौतुक होत असे. त्याचें त्यांस यावेळीं स्मरण झालें. जिजाबाईपुढें काठीचाघोडा करून रंगणावर संभाजी महाराज धरीत असत ; व कधीं कधीं पाय अडखळून पडले असतां जिजाबाई पोटाशीं धरीत असत. अशा बाळपणच्या हरएक कृति जिजाबाईपुढें यावेळीं मूर्तिमंत उभ्या राहिल्या आणि दुःखाचे लोट येऊन ऊर भरून आला. " माझा संभू मला केव्हां भेटेल " असें ह्मणून जिजाबाईनीं पुनः हंबरडा फोडला. महाराजांचे या गुप्त मसलतींत दक्षिणेंतून

राहिलों आहेत. याजमुळें मी फार जेरीस आलों आहें— त्यांस परत दक्षिणेंत जाण्याची आज्ञा असावी— अवरंगजेबानें महाराजांची ही विनंती तर तावडतोब मान्य केली ; कारण त्यायोगें शिवाजी पूर्णपणें आपल्या कबज्यांत आला, अशी त्याची समजूत झाली. परंतु महाराजांस हा अवरंगजेबाचा हुकूम पुढील व्यवस्थेस मोठा सहाय्य झाला. गुप्तरूपें दिल्ली शहराबाहेर दोन घोडे अगदीं तयार ठेविले होते. महाराज दिल्ली शहरा बाहेर आल्यावर अगदीं संध्याकाळ झाली. त्या गुजरीचे वेळेस आपण व संभाजी महाराज पेटाऱ्यांतून बाहेर पडून घोड्यावर बसले, ते तसेच प्रातःकाळास नेमले स्थलीं दाखल झाले. तेथें महाराजांनीं साधूचा वेष धारण केला आणि संभाजी महाराजांस दक्षिणेंतून आलेल्या व दिल्लीहून येथें गेलेल्या मंडळीचे हवाली केलें आणि आपण पुढें चालते झाले.

जी ब्राह्मण मंडळी जाऊन दिल्लीहून गुप्तरूपें परत आली त्या सर्वांनीं आपले वेष तद्देशीय केले होते. त्यांचे हवाली एके गांवीं महाराजांनीं संभाजी महाराजांसकरून मथुरे-पलीकडे सोडून दिलें. मोंगलांचे स्वार धर्म-शाळांतून, सरायांतून, त्यांचे मुक्कामाचा शोध करण्यास आले असतां त्या मंडळीनीं संभाजी महाराजांस एके समयीं कंठाळीखालीं दडपून ठेविलें.* स्वार नि-घून गेल्यावर अशा प्रकारें शेवट लागणार नाहीं. असें मनांत आणून मथुरेस आल्यावर नाथजीचे देवळांतील पुजारी ब्राह्मणाशीं मसलत करून देवाचे गाभाऱ्यांत नाथजीचे सेवेस ज्या स्त्रिया असतात त्यांत स्त्रीवेष देऊन संभाजी महाराज यांस ठेविलें. या पुजारी ब्राह्मणांस दक्षिणेंत हिंदुराजा उत्पन्न झालेला असून त्यास देवी प्रसन्न आहे, तो मोंगलांची चांगली खोड मोडतो, ही कीर्ति माहीत होती. तशांत कांहीं संकट आलें तरी हिंदूंस म-दत करावयाचीच असा निश्चय करून त्या पुजाऱ्यानें

---

* या विषयीं आणखी दुसरे एके मुक्कामाची दंत कथा अशी आहे कीं, एके गांवीं युवराज संभाजी महाराजांसह मंडळी असतां अवरंगजेबाकडील हेर आले, अशी खबर लागली. ते समयीं भोजनाचीं पात्रें मांडलीं होतीं. त्यांजवर सर्वजण एके पंगतीस भोजना-स बसले तेव्हां हे सर्व ब्राह्मण आहेत असें समजून हेर परत गेले.

संभाजीस आपले स्वाधीन करून घेतलें. त्यावेळीं लाख रुपयांचे जाहीरनामे जो कोणी शिवाजीची नुस्ती खबर कळवील त्यास देण्याविषयीं लागले होते. त्यास जो कोणी सहाय्य करील त्याचें घर लुटून देहांत शिक्षा केली जाईल असेंही लागले होते. नंतर या बरोबरीच्या मंडळीं पैकीं कांहीं लोक*तेथें मथुरेस गांवांत राहिले, आणि कांहीं गुप्त वेषानें महाराजांस केलेली व्यवस्था सांगण्यास गेले. महाराजांनीं ही सर्व वृत्तांत हकीगत आईस विदितकरून सांगितलें कीं, "वेळोवेळ मजला शंभूची खबर समजत असे. आपला संभू खुशाल आहे. काळजी करावयास नको. थोडे दिवसांतच तो येथें दाखल होईल." असें जरी सांगितलें तरी तिचे मनाची शांति होईना. संभाजी येईपर्यंत जिजाबाईनीं अन्न खाण्याचें सोडून दिलें. अनेक ब्राह्मण अनुष्ठानास बसविले. महाराज रायगडीं दाखल झाल्यावर त्यांचे गैर हजेरींतील सर्व अव्यवस्था नीटनेटकी करून फौज जमाकरण्याचा हुकूम केला. फौज एकत्र झाल्यावर मोंगलाचे मुलुखांवर असे घसरे मारिले कीं, त्यांच्या खबरा दिल्लीस जाऊन

---

*श्रीछत्रपती महाराज दक्षिणेंत कोणते रस्त्यानें परत आले या विषयीं दंतकथा अशी आहे कीं, मथुरेचे आसपास गांवांत प्रथम येऊन नंतर काशी कडे गेले. आणि तेथून जगन्नाथाकडे साधुचा मेळा जात होता त्याजमध्यें जाऊन मग जलमार्गानें आपले राज्याच्या हद्दींत आले.

अवरंगजेबास त्राही, त्राही, करून सोडिलें. या मोहिमींत जे, जे, मोंगलांकडील सरदार व अम्रूदारलोक सांपडले त्यासर्वांस लष्कराबरोबर आणून पुण्याजवळील चाकणचे किल्ल्यांत बंदीत टाकले. हीं कामें होत आहेत तों थोडेच दिवसांनीं ती मथुरेची मंडळी आपल्या गुप्तवेषांतच रायगडीं दाखल झाली. संभाजी महाराजांस स्त्रीवेषांतच महाराजांचे हवालीं केलें. त्या वेळीं संभाजी सुरक्षित आलेला पाहून महाराजांस, जेजाबाईस व सर्व रायगडवासीजनांस जो आनंद झाला, त्याचें मी शद्वानें वर्णन करण्यास असमर्थ आहें. थोडक्यांत सांगितलें तर यमुनेंतून श्रीकृष्ण भगवान् परत आल्यावर यशोदेस व सर्व गोकुळवासीजनांस जसा आनंद झाला, तसाच आनंद रायगडावरील अबालवृद्धांस झाला. महाराजांनीं युवराज संभाजी महाराज सुरक्षित येऊन पोहोंचल्याबाबद अनेक धर्मादाय केला. मथुरेचे विश्वासु ब्राह्मणांस मोठमोठे पोषाख, अलंकार भूषण आणि रोख ऐवज मिळून एकंदर ४ लक्षांचा विषय दिला. मथुरेच्या श्रीकृष्णाचे देवास ज्या देवळांत संभाजी महाराज राहिले होते, त्या देवास अलंकार भूषणें दिली. मथुरेचे ब्राह्मणांनीं महाराजांस विनंती केली कीं, "हें इतकें विपुल द्रव्य आम्ही सुरक्षित घरीं नेऊं अशी आम्हांस अशा नाहीं. वाटेंतच धनाचे पायीं आमची समाप्ती होईल! कसें करावें?" तेव्हां महाराजानीं त्यांस सडे रवाना करून विश्वासुमावळे

शिपायांबरोबर द्रव्य देऊन त्यांचे घरीं मथुरेस पोहोंचतें केलें. या प्रमाणें दिल्ली शहरीं महाराज जाऊन परत आले ; त्याचा शेवटपर्यंत इतिहास झाला ; यानंतर दोन तीनवर्षें महाराजांनीं आपला काळ राज्याचे सुधारणेंत व कारभारसंबंधी नियम करण्यांत घालविला. महाराष्ट्रदेशांतील लोकांनीं आपाप सांत द्वेषभाव ठेवूंनये, राज्यप्रकर्णीं सर्वांनीं एकत्र रितीनें दक्ष असावें, अशा विषयीं रामायण, भारत, वगैरे ग्रंथांतील उत्तम उत्तम कथा विद्वान् शास्त्र्यांचे मुखांतून श्रवण करवून लोकांस राज्यनीति विदीत केली. वेळोवेळीं परळीस जाऊन गुरूमुखानें राज्याचें कर्तव्य काय तें सर्व समजून घेतलें. जमाबंदी, फौजखातें, वगैरे राज्यकारभाराबाबद नियम करवून त्याप्रमाणें राज्य कारभार चालविण्याचा निश्चय केला. हीं कामें १६६८ पासून १६७१पर्यंत महाराजांनीं केलीं. सन१६७२साली पुण्याजवळ चाकणचे किल्ल्यांत जे कितीएक मोंगलांकडील मोठमोठे सरदार वगैरे कैदेंत आणून टाकिले होते, त्यासर्वांस रायगडावर बोलविलें नंतर त्यांचे योग्यतेप्रमाणें खाण्यापिण्याची व्यवस्था करवून कांहीं दिवस त्यांस रायगडीं ठेवून घेतलें ज्यांच्या जखमा बऱ्या झाल्या नव्हत्या त्यांस औषधें उपचार करून सर्व बरे झाल्यावर " ज्यानें त्यानें आपले धर्माप्रमाणें चालावें, त्यांतच मोक्ष आहे." असा उपदेश करून शेवटीं सांगितलें कीं, "तुह्मी आपल्या देशीं जात असाल तर खर्चास द्यावें; माझे रा

ज्यांत नोकरी पतकरीत असाल तर तुमचे योग्यतेप्रमाणें कामें देतों." या लोकांपैकीं बरेच लोक महाराजांचे राज्यांत नोकरी धरून शेवटपर्यंत राहिले.

---

सन १६७४

# श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा दरबार.

या वेळीं मुंबईस इस्ट इंडिया कंपनीचें जें दुकान होतें, त्या दुकानचे तर्फेनें शिवाजीमहाराजाशीं व्यापार संबंधानें तह करण्याकारितां तीन असामी साहेब लोक रायगडीं गेले होते. ते तेथें वैशाख, ज्येष्ट, आणि आषाढ, हे तीन महिने राहिले, त्या वेळीं जो दरबार भरला होता, त्याचें वर्णन त्यांनीं लिहून ठेविलें आहे. त्याचा गोषवारा येणेंप्रमाणें.

शिवाजी महाराजांकडे मुद्दाम रायगडावर जाऊन तह करण्याचें या मंडळीस असें कारण झालें कीं, महाराजांनीं करनाटकांतील मोंगलांचे हद्दींतील हुबळी शहरावर मोहीम केली, ते समयीं परत येतांना वाटेंत कंपनीचें कारवारास दुकान होतें, तें लुटलें! त्याचप्रमाणें सुरत शहर लुटलें, ते समयीं कंपनीचें दुकानास बरीच तोसीस लागली याकारितां; व दुसरें कारण

असें होतें कीं, दक्षिणेंत जो कंपनीचा व्यापार चाल-त होता तो निर्विघ्नपणें चालत नसे, तो चालावा. या दोन कारणाकरितां ही मंडळी रायगडीं आली. या मंडळींत मिस्तर हेनरी आकज्नन ह्मणून मुख्य साहे-ब होते. तेच पुढें सन १६७६ साली मुंबईचे डेपुटी गव्हरनर झाले. ही मंडळी मुंबईहून निघून चौल गावांवरून रोहें अष्टमींचे मार्गे रायगडाचे पायथ्या पाशीं (पाचाड*) नांवाचा कसबा जो त्यावेळीं व्या-पार वगैरे संबंधानें चांगले स्थितींत होता, तेथें येऊन दाखल झाली. तेथील कारभारी नारायण-जीपंडीत याजपाशीं आपला येण्याचा उद्देश निवेदन करून, नारायणजीस एक हिऱ्याची आंगठी, आपल्या कामास त्यांनीं मदत करावी ह्मणून नजर केली. यासमयीं शिवाजीमहाराज प्रतापग-डावर महाराजांची सहाय्यकारी जी आदिमाता भवानीदेवी, जिच्यावर महाराजांचा पूर्ण विश्वास तिची सुवर्ण पुष्पांनीं पुजा करण्याकरितां गेले होते. यामुळें या मंडळीस रायगडावर जाण्याची परवानगी मिळाली नाहीं. सबब तेथेंच ह्मणजे चार पांच दिवस मुक्काम करून राहिली. पांचाडगांवीं महाराज परत रायगडीं दाखल झाल्यावर नारायणजी पंडीत यांस बरोबर घेऊन रायगडावर मंडळी गेली. तेथें राजवाडा आणि

*हल्लीं पाचाड गांवीं पांचदहा मावळे लोकांचीं मात्र झोपडीं आहेत.

कारभारी यांचीं घरें याचे दरम्यान परराज्याकडील लोक उतरण्याकरितां ह्मणून घर बांधलें होतें, तेथें ही मंडळी जाऊन उतरली. यावेळीं राज्याभिषेक होण्याची घणघोर तयारी चालली होती.. यामुळें या विलायती मंडळीची भेटहोण्याचा योग कांहीं केल्या येईना. नारायणजीचे यत्नानें शेवटीं एकदिवस निश्चित् ठरून तशी यांस वर्दी मिळाली. ( हरकतीचे कागद महाराजांकडे आधींच नारायणजीमार्फत पाठवून दिले होते. ) या वकिलांनीं महाराजांकडे जी यादी पाठवून दिली होती, त्यापैकीं दोन कलमें अमान्य करून बाकीं सर्व कलमें कबूल केलीं. महाराजांनीं जीं कलमें नाकबूल केलीं तेवढी मात्र येथें सांगतों:—

कंपनीचेंह्मणणें होतें कीं, " आमचें नाणें महाराजांचे राज्यांत चालावें." याविषयीं महाराज असें ह्मणाले कीं " जर कंपनीचें नाणें चोख असेल तर मग माझे राज्यांतील रयत सहज त्याच्याशीं व्यवहार करील, याजबाबद कलम यादींत घालण्यास नको." दुसरें कलम असें होतें कीं, " कंपनीचे गलबतांतील माल वाहत वाहत महाराजांचे राज्यांतील बंदरांत आला असतां, किंवा कंपनीचें गलबत महाराजांचे राज्याचे हद्दींत फुटलें असतां, तें परत कंपनीस मिळावें. " या दुसरे कलमा बाबद महाराजांनीं असें सांगितलें कीं, " वहात आलेला माल व गलबत परत देणें हें कोंकणचे रिवाजास अनुसरून नाहीं. इतकें असूनही जर ही व्यवस्था

आह्मीं इंगलिश व्यापाऱ्यांकरितां केली, तर आह्मापाशीं डच्च व फ्रेंच लोकही तसेंच मागणें करतील! या करितां अशी नवी रीत सुरू करतां येत नाहीं.'' बाकीच्या कलमां बाबद विचार करून यादी तयार करण्याचें काम आबाजीसोनदेव व युवराज संभाजी महाराज यांजवर महाराजांनीं पूर्वीं सोंपवून दिलें होतें त्या प्रमाणें काम तयार करून हे दोघेही सभेस हजर झाले.

तारिख ६ जून सन १६७४ रोजीं दरबार भरला. कंपनीचे वकील पोषाख करून नजर नजराणा कसा काय करावयाचा, याची रीतभात समजून घेऊन तेथें आले. महाराज भव्य सिंव्हासनावर बसले होते. भालदार, चोपदार, यांचे हातांत सोनेरी रुपेरी, राजदंड असून त्यांच्या ललकाऱ्या चालल्या होत्या. सिंव्हासमाजवळच खालीं युवराज संभाजी महाराज बसले होते. पलिकडे मोरोत्रिंबक पेशवे, व हंसाजी हंबीरराव सेनापती वगैरे मंडळी बसली होती. सिंव्हासनाचे उजवे बाजूस सोनेरी माशांचीं डोकीं, त्यांचे मोठमोठाले दांतासुद्धां टांगलेलीं होतीं. डावे हातास मोराचे पिसांचे झबके टांगले होते. सिंव्हासनाच्या पायऱ्यांवर सोनेरी पत्रे जडले होते. अशा प्रकारच्या या दरबारांत मिस्तर हेनरी आक्जनन साहेब पायांतील बूट बाहेर काढून आले. आणि प्रथम दुरून मोठ्या अदबीनें महाराजांस मुजरा केला. नारायणजीचे सहाय्यानें हिऱ्याची आंगठी व विलायती मौल्यवान् वस्तु वगैरे महाराजांचे सिंव्हासनापुढें ठेविल्या. महारा-

जांनीं चालीप्रमाणें नजर नजराण्याकडे नजर करून साहेबांस अलीकडे आणण्याविषयीं आज्ञा देऊन सिंव्हासनाजवळ बसविलें. यावेळीं महाराजांचा चेहरा भव्य, गंभीर, कुलवान् मराठ्यांच्या तोंडावर जशी वीरश्रि दिसत असते तसा दिसत होता. महाराजांचे डोळे पाणीदार असून भव्य होते. त्यांची दाढी थोडीशीच पण बेतशीर असून त्यांच्या चेहऱ्यास शोभणारी अशी होती. नाक बोथीकडे निमूळतें व खालीं वळलेलें असें दिसत होतें. असें त्या वर्णनांत चेहऱ्याचें वर्णन दिलें आहे. मोरोत्रिंबक यांस तहाची कलमबंदी वाचण्याविषयीं महाराजांनीं आज्ञा केली. तें वाचन झाल्यावर पूर्वेकडील दरबारचे शिरस्त्याप्रमाणें मुख्य मुख्य अधिकारी यांनीं त्याजवर सह्या केल्या, आणि दरबार बरखास्त झाला.

---

## श्रीछत्रपती शिवाजी महाराजांस राज्याभिषेक.

सन १६७४ रांत महाराजांनीं आपणांस स्वतंत्र राजा ह्मणवून तसें प्रसिद्ध केलें. दहा वर्षांपूर्वीं आपल्या नांवाचें नाणें पाडण्याचें सुरू केलें होतेंच. सालमजकुरीं शास्त्राप्रमाणें महाराजांस राज्याभिषेक झाला. त्याची हकीगत येणेंप्रमाणें.

या समारंभास देशोदेशींचे विद्वान् ब्राह्मणांस अमंत्रणें पाठवून रायगडीं बोलाविलें होतें. काशीक्षेत्रींचे पंडीत गागाभट्ट यांस सन्मानानें रायगडावर आणिलें. महाराजांचे राज्यांतील सरदार, दरकूदार, मुत्सद्दी, प्रतिष्ठित गृहस्थ व परराज्यांतील लोक यांस अमंत्रणें पाठवून मोठा समुदाय एकत्र केला. प्रथम शास्त्रप्रमाणें ज्येष्ट शुद्ध ६ शके १५९६ आनंदनाम संवत्छर रोजीं महाराजांचा वृतबंध होऊन पुढें सात दिवसपर्यंत हा समारंभ एक सारखा चालू होता. याच सुमारास महाराजांनीं आपली तुळाकरून अगाणित धन ब्राह्मणांस वांटलें. आपले अष्ट प्रधानांस संस्कृत नांवें जोडिलीं. रायगडावर ठिकठिकाणीं पाकशाळा, भोजनशाळा, इत्यादि मंडप तयार केले. ज्या स्थळीं महाराजांस अभिषेक व्हावयाचा तेथें मंडप घालून त्यांत अनेक लोक त्यांचे त्यांचे योग्यतेप्रमाणें बसूं शकत अशा निरनिराळ्या जागा तयार केल्या. हा मंडप मौल्यवान् कपड्यांनीं अच्छादिला होता. सोनेरी कलाबतूनें वेष्टित असे ठिकठिकाणीं खांब उभे केले. प्रत्येक कोनांत भरजरी अष्टपैलु निरनिराळ्या रंगाचे खांब शोभिवंत उभे केले; त्यायोगें निरनिराळे योग्यतेचे लोक बसण्याच्या जागा विभागल्या.

*सदरहुचा श्लोक; प्रधान, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत न्यायाधिश दिव्यशास्त्री ॥ सेनापती त्यांत असे शहाणा अष्टप्रधानीं नृप मुख्य जाणा ॥ १ ॥

देशोदेशींचे उत्तम गवई, उत्तम वाद्यें वाजविणारे, वाजंत्री, होलार, शिंगें, तुतारी वाजविणारे इत्यादि रायगडीं एकत्र केले. त्यांस बसण्याच्याजागा सभामंडपापुढें कमानींच्या केल्या. सर्व रायगडावर पताका, तोरणें, गुढ्या, उभारल्या. सर्व रस्ते सुगंधिक द्रव्यांनीं सिंचन केले. प्रत्येक नागरिक जनानें आपल्या दारांपुढें रंगीबेरंगी रांगोळ्या घातल्या. रस्तोरस्तीं केळीचे खांब लाविले असून त्यांजवर गुलाब, शेवंती, मोगरा इत्यादि पुष्पांच्या माळा टांगल्या. गुरुवर्य रामदासस्वामींचा शिष्यवर्ग उतरण्याकरितां श्रीजगदीश्वर महादेवाचे शेजारी मंडप घातला. जगदीश्वराचें देऊळ किनखाप, मश्रु इत्यादि मौल्यवान् वस्त्रांनीं सुशोभित केलें. गाभाऱ्यांतील शाळुंखा निव्वळ सोनेरी कलाबतूत हिरे, माणकें गुंफून त्यानें अच्छादिली. ठिकठिकाणीं लोकांस उतरण्याकरतां मंडप घातलेले होते त्या मंडपांतून आलेले सरदार, अमीर, उमराव, येऊन उतरले. कोणकोणत्या अधिकाऱ्यांनीं काय काय कामें करावीं, व कोण कोणते वेळीं काय काय कृत्यें व्हावीं, याचा अनुक्रमवार नियम ठरला. त्याप्रमाणें जो तो आपापले कामांत तत्परतेनें हजर राहत असे. इकडे अभिषेक स्थलाचे मंडपांत हरणांचीं कातडीं व व्याघ्रांबरें ठेविलेलीं होतीं. हरएक पवित्र स्थलांतून आणविलेलीं उदकें ( तीर्थें )व सागराच्या पाण्यांनीं भरलेल्या कुंभ्या अभिषेकस्थळीं तयार ठेविल्या. ज्येष्ठ शुद्ध

७ शके १५९६ रोजीं प्रातःकालीं गणपती पूजन होऊ महाराजांचे मस्तकीं मुगूट ठेवण्याचा समारंभ झाला. य संबंधानें धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अग्निसिद्ध होऊ न होम हवनें चालू झालीं. ऋत्विज ब्राह्मणांचे समूह यज्ञमंडपांत दररोज एकत्र होत. अग्निकुंडांत घृताच्या धारा चालल्या. त्याचप्रमाणें मंत्रोच्चार करून हवनीय द्रव्यें यांचा स्वाहाकार चालला होता त्या योगें अग्निनारायण संतुष्ट होऊन " चत्वारिशृंगात्र यो अस्य पादा द्वेशीर्षे सप्त हस्तासो अस्या " या वर्ण नाप्रमाणें आहुति ग्रहण करण्याकरितां जसा काय मूर्ति मंत उभा आहे असें भासत होतें. त्या शुद्ध घृताच्या धूम्रसुगंधीनें तो मंडप व राजवाडा अगदीं कोंडून गेला. याप्रमाणें दररोज हवनें चाललीं. हा अग्नि सात दिवसपर्यंत संरक्षिला. दररोज वाजंत्री, चौघडे, होलार, यांचीं वाद्यें सांज सकाळ सुस्वर वाजत; दिवसास गवयांचीं गाणीं, रात्रौ नृत्य करणाऱ्या स्त्रियांचीं नृत्यें चालू असत. याप्रमाणें ज्येष्ठ शुद्ध १२ पर्यंत उपक्रम चालला. शुद्ध १३ हा अभिषेकाचा मुख्य दिवस असल्या मुळें त्यादिवशीं अष्ट प्रधानादि कारभारी यांनीं प्रातःकाळीं स्नान संध्यादि कर्में आटपून उंचीं वस्त्रें व अलंकार भूषणें परिधान करून सभामंडपांत दाखल झाले. वेदशास्त्रसंपन्न गागाभट्ट यांचे आज्ञेप्रमाणें महाराजांनीं प्रथम चार स्नानें केलीं. तीं अशीं:·प्रथम मृत्तिका स्नान, नंतर गोमयस्नान; त्या नंतर मधु, शर्करा, घृत

व दुग्ध यांचें स्नान केलें. शेवटीं पवित्र तीर्थांतून आणिलेल्या उदकांचें स्नान केलें. तदनंतर शुभ्र वस्त्रें परिधान करून, सिंव्हासनाशेजारी पाट मांडले होते त्याजवर महाराज येऊन बसले. त्यांचे शेजारी दुसरे पाटावर राजपत्नी सौभाग्यवती सोयराबाईसाहेब तैलाभ्यंग स्नान करून उंचीं वस्त्रें नेसून अलंकार भूषणें घालून येऊन बसल्या. त्यांचे पलीकडे तिसरे पाटावर युवराज संभाजीमहाराज येऊन बसले. अष्ट प्रधानादि कारभाऱ्यांनीं शुभ्र पोषाख परिधान करून अनुक्रमें प्रथम पूर्वभागीं मुख्य मंत्री मोरो त्रिंबक पिंगळे तुपानें भरलेलें सुवर्णपात्र हातांत घेऊन उभे राहिले. दक्षिणेस सेनापती हंसाजी हंबीरराव मोहिते हातांत रुप्याचे पात्रांत दुग्ध घेऊन उभे राहिले. पाश्चिमेस जामदारखान्याकडील कारभारी रामचंद्र बावडेकर हातांत मधुपात्र घेऊन उभे राहिले. उत्तरेस न्यायाधिश रघुनाथपंडीत सुवर्ण पात्रांत गंगोदक घेऊन उभे होते. याप्रमाणें आण्णाजी दत्तु, जनार्दनपंत हणमंते, परराज्यसंबंधीं कारभारी वगैरे भोंवतालीं उभे होते. बाळाजीपंडीत सरन्यायाधिश हातांत भगवद्गीतेचें पुस्तक घेऊन उभे राहिले. ज्या पात्रांतून हीं द्रव्यें घेतलेलीं होतीं त्या पात्रांस सहस्त्र धारा होत्या. या मुख्य मंडळींचे मागें मदतीकरितां म्हणून दुय्यम कारभारी मंडळी उभी होती. त्यांचे मागें शास्त्री, पंडित यांच्या बसण्याच्या जागा केल्या होत्या. दरम्यान ठिकठिकाणीं मावळे सरदार, कोणाचे डोक्यावर पिळदार पागोटें

तर कोणाचे डोक्यावर मंदील; कोणाचे कंबरेस जंबिया; तर कोणाचे खाकेंत लटकती तलवार! याप्रमाणें आपापलीं हत्यारें लटकावून महाराजांचे सेवेस तत्पर तेनें इकडून तिकडे फिरत होते तिकडे पलीकडे थोडे अंतरावर कनाती, व चिकाचे पडदे लाविले होते. त्यांत राजकुळांतील स्त्रिया व दुसऱ्या अनेक स्त्रिया एकत्र झाल्या होत्या. याप्रमाणें सर्व तयारी झाली असतां प्रथम भिक्षुक ब्राह्मणांकडून वेद मंत्रोच्चार होऊन श्रीशिवछत्रपती महाराजांवर अक्षता व अम्रपल्लवांनीं सीतोदकाचे अभिषेकास आरंभ झाला. तिकडे मंगल वाद्यें वाजूं लागलीं. भोंवतालचे अष्ट प्रधानांनीं हातांत घेतलेल्या पात्रांच्या सहस्रधारांनीं महाराजांस अभिषेक केला. याप्रमाणें अभिषेक परिपूर्ण झाल्यानंतर वेदशास्त्रसंपन्न रा० गागाभट्ट यांचे आज्ञेनें प्रथम महाराजांनीं आपलें मुख आरशांत पाहिलें, नंतर पातळ तुपांत अवलोकन केलें. तदनंतर साधुजन व रामदास स्वामींचें दर्शन घेतलें. गुरुरायांनीं महाराजांस आशिर्वाद दिला. सरतेशवटीं महाराजांनीं पुन्हा शेवटचे शुद्धोदकांनीं स्नान केलें. इकडे सिंव्हासनावर रेशमी सरपोस घातला. त्याचे चार बाजूस सिंव्ह, व्याघ्र, इत्यादि चित्रें काढिलेलीं होतीं. त्याजवर प्रथम हरणाचें चर्म पसरलें. त्याजवर टांकशाळेंतून ताजें नवेंनाणें पाडिलें होतें, तें आणून पसरलें. त्याजवर व्याघ्रांबर घालून वरती काश्मिरी शाला घातल्या. सिंव्हासनाचे मागचे भागीं सोन्याची कमान करून तीस हिरे, नाणकें बसविलेलीं होतीं. मोत्यांच्या

शाळा व घोंस लोंबत टांगलेले होते. सिंव्हासनावर छत्र, चामर, वगैरे राजचिन्हें धरिलीं. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें शिव आणि विष्णु यांच्या सुवर्णमूर्ती-ज्यांचे दर्शन सिंव्हासनावर बसले असतां सत्य वर्तन होण्यास्तव व्हावें अशाप्रकारें-पुढें ठेविल्या. याप्रमाणें तयार झालेल्या सिंव्हासनावर छत्रपती शिवाजी महाराज येऊन बसले. महाराज सिंव्हासनावर बसतांक्षणींच रायगडावर १०८ तोफांची सरबत्ती झाली. त्याचप्रमाणें राज्यांतील सर्व किल्ल्यांवरून अनुक्रमें सरबत्त्या झाल्या. महाराजांवर सर्वांनीं सुवर्ण पुष्पांची वृष्टि केली. सोळा ऋषिपत्न्यांनीं ( ब्राह्मण स्त्रियांनीं ) सभास्थानीं येऊन महाराजांस पंचारत्यांनीं ओवाळिलें. महाराजांनीं त्यांस वस्त्रें भूषणें देऊन आनंदीत केल्या. याच वेळीं रायगडावरील श्रीजगदीश्वरास अखंड नंदादीप व पूजा, नैवेद्य, यांची नेमणूक महाराजांनीं बांधून दिली. अशाप्रकारें प्रत्यक्ष शिवाचे अवतार जे शिवाजी महाराज यांनीं पुढें उत्तम न्याय, उत्तम नीति, उत्तम सद्वर्तन, असें प्रकारें राज्यकारभार रायगडीं चालविला. यामुळें रायगडास केवळ इंद्रपुरीची उपमा आली. अनेक हिंदुलोक मोंगलांचे जुलुमास त्रासून शिवछत्रपतीचे छायेखालीं राहण्यास येत, त्यांस महाराज त्यांचे योग्यतेप्रमाणें कामें देत ; प्रजांचे केवळ पुत्रवत पालन करीत. ठिकठिकाणचे हेर अनेक खबरा महाराजांस दररोज येऊन विदित करित असत. सर्व राज्यकारभार सत्यानें व नीतीनें चालला. प्रजा

आनंदी असून न्याय नीति मूर्तिमंत तेथें वास करीत होतं अशाप्रकारें राज्यकाभार चालला असतां, दौलताबादे कडील जालन्याचे *मोंगल अधिकाऱ्याकडून तिकडील प्रांतांतील रयतेवर* अतिशय त्रास व जुलूम होत आहे, अशी खबर समजली. यावरून त्या मोंगल अधिकाऱ्यास शिक्षाकरण्याचा निश्चय करून महाराजांनीं सरदारांस रायगडीं एकत्र होण्याविषयीं आज्ञापत्रें पाठविलीं निवडक लोकांनिशीं जालने शहरावर स्वारी करून तेथील अधिकाऱ्याची खोड मोडून परत रायगडीं महाराजांची स्वारी दाखल झाली. यावेळीं महाराजांचे वास त्रेपन्नावें वर्ष लागलें. ही स्वारी महाराजांची *होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. रायगडी परत आल्यावर महाराजांस थोडेसें थकल्यासारखें वाटून ताप आला. तो ताप पुढें ज्यास्त होत जाऊन त्यांतच महाराजांचा अंत झाला. ज्येष्ठ शुद्ध १५ रविवार शके १६०२ रौद्रनामसंवत्छरे तारीख ५ एप्रील सन १६८० रोजीं संध्याकाळीं या आर्यभूमीचा प्रतापी सूर्य अस्तास गेला. हर! हर! केवढा हा दुःखाचा प्रसंग! त्या रायगडवासीं जनावर आकाशांतील धोंड येऊन पडली. सर्व प्रजाजन शोकसागरांत बुडून गेले! शेवटीं महाराजांचें द्वितीय चिरंजीव राजाराम महाराज यांस गादीवर स्थापून, महाराजांच्या

---

*या समयीं संभाजी महाराज त्यांच्या एकंदर वाईट वर्तनामुळें पन्हाळया किल्यावर नजर कैदेंत शिवाजी महाराजांनीं ठेविलें होतें; संभाजीचे वर्तनावरून तो राज-

शवाचें दहन श्रीजगदीश्वर महादेवाचे देवळासमोर दरवाज्याबाहेर केलें! तेथें वृंदावन बांधिलें आहे.

## रायगड किल्ल्यावरील सांप्रतच्या स्थितीचें वर्णन.

रायगडकिल्ला हा उत्तर, दक्षिण अक्षांश १८·१४ व पूर्व पश्चिम अक्षांश ७३·२० आणि समुद्राचे सपाटी पासून २८५१ फूट उंचीवर आहे. अलीबाग जिल्ह्यांतील महाड ह्मणून तालुक्याचें ठिकाण आहे. तेथून उ-उत्तरेस सह्याद्री पर्वताची जी रांग आहे त्या रांगेंतील एके शिखरावर हा किल्ला वसलेला आहे. महाडांतून गांधारी नदीचे कांठानें रायगडाकडे जाण्यास निवालें

---

पदास योग्य नाहीं अशी महाराजांची खात्री होऊन राहिली असल्यामुळें शेवटीं त्यानीं राजारामास गादीवर बसविण्याविषयीं आज्ञा केली होती. त्याप्रमाणें कारभारी मंडळींनीं व्यवस्था चालविली. पुढें संभाजी महाराजास महाराज स्वर्गवासी झाल्याची खबर लागतांच कांहीं शिबंदीस अनुकूळ करून घेऊन एकदम रायगडीं दाखल झाला आणि प्रथम राजारामाचे मातोश्रीस तूं मांझे बापास विष घालून मारलें असा तिजवर आरोप ठेवून भर दरबारांत तिची निर्भत्सना करून हालकरून मारून टाकलें. व तिचे पक्षांचे एके पुढाऱ्यास तर कडे लोट केली.

ह्मणजे रायगडाचे पायथ्यापाशीं पांचाड गांवाचे डोंगरांत प्रथम सांवतांची चौकी ह्मणून एक ठिकाण लागतें. त्या चौकीचे जोत्याची लांबी फूट २० व रुंदी फूट १५ आहे. ती चौकी टाकून डोंगरांत चढत गेलें असतां पुढें ज्या मोठे डोंगराचे शिखरावर रायगड हा किल्ला वसलेला आहे, त्या डोंगराचे कडसरीसच पांचाड नांवाचा गांव लागतो. या गांवीं अझून जुन्यावाड्याचीं भिंताडें आहेत त्या ठिकाणास कोट असें ह्मणतात: या वाड्याचे चारी बाजूस तटबंदी असून त्याचे आंत पाण्याचीं टांकीं, व घरांचीं जोतीं, जशींच्या तशींच अजून आहेत. तसेच हत्ती, व घोडे, बांधण्याच्या जागा आहेत. या स्थळीं पूर्वीं श्रीछत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाईसाहेब राहत असत; तटबंदीचें आंतील मुख्य घराचें जोतें २०० फूट लांब व ४० फूट रुंद असें आहे. तटाची एकंदर पूर्व बाजूची लांबी ४२० फूट व रुंदी दक्षिण उत्तर ३८० फूट आहे. तटाचे भिंताडाची जाडी ६ फूट आहे. उंची ८ फूट पासून १२ फूट पर्यंत जमिनीचे उंच सखल मानाप्रमाणें आहे. येथून पुढें किल्ल्याकडे जाऊं लागलें असतां हबशी कारकिर्दीतील दोन चौक्यांचीं जोतीं लागतात. त्यांचीं लांबी फूट ३० व रुंदी फूट १८ आहे. या ठिकाणीं रहाणाऱ्या हबशाचें नांव याकुबखान असें होतें. तसेंच पुढें डोंगराचे खिंडींत जातांना चित दरवाजा ह्मणून लागतो. हा दरवाजा कोसळलेला असून त्याजवर बुरूज किंवा तटबंदी कांहीं एक

नाहीं. त्याचे वरचे बाजूस पुढें एक बुरूज मात्र लागतो त्यास खुलाबत ( खूपलढला. ) असें नांव आहे. या बुरुजाची उंची फुटी २७ व घेर ९० फूट आहे. एथून डोंगरांत जाण्यांच्या पायऱ्या अव्यवस्थीत झालेल्या धों-ड्यांनीं बांधलेल्या जुन्याकाळच्या ठिकठिकाणीं दृष्टीस पडतात. 'पांचाड' गांवाहून रायगड किल्ल्यावर जाण्याचा जो हा रस्ता आहे, त्याचे डावे बाजूस डों-गराचे पायथ्याशीं वाडी ह्मणून गांव लागतो. या वाडी गांवाहून वर किल्ल्याचे महादरवाज्यापर्यंत एकंदर चढाव ह्मटला ह्मणजे साडेचार किंवा पांच मैल पर्यंत आहे. पायीं चालणारास मात्र सोईचें आहे; परंतु घोडे वगैरे वरून जाणें हें जोखमीचें आहे. त्याच प्रमाणें मेणा किंवा डोलींतून जाणें हीमोठ्या अडचणीचें आहे. जर या रस्त्याची हल्लीं रिपेर झाली नाहीं, तर आणखी दहा पंधरा वर्षांनीं रायगड किल्ला पाहण्यास जाणें देखील होणार नाहीं! अशी माझी समजूत आहे. डोंगराचे पायथ्याशींच वर चढून थोडेसें गेलें असतां डावे हातास महाराजांचे वेळची बाग लागते. या बागेंत कांहीं चुनेगच्ची बसण्या सारख्या जागा केलेल्या असून आंब्यांचीं, फणसांचीं, झाडें लाविलेलीं अजूनपर्यंत आहे-त. याच ठिकाणीं कांहीं दगडांचीं थडगीं बांधलेलीं असून त्यांत हाडें ठेविलेलीं दृष्टीस पडतात. यामुळें पारशी लो-कांचे संबंधानें तर हीं थडगीं नसतीलना? असा संशय ये-तो. एथून पुढें चढत गेलें असतां नानाचा दरवाजा ह्मणून लागतो. याची रुंदी फुटी ८ व उंची फुटी १९

व दरवाज्यानजीक दोन बुरूज आहेत. त्या प्रत्येक बुरूजाचा परीघ फूट ८० व रुंदी फूट १५।१२ अशी आहे. दरवाज्यासुद्धां तटबंदीची उंची १९ फूट व लांबी ३३ फूट आहे. दरवाज्याचे आंतील बाजूस एक ट कमान आहे. दोहों बाजूस बसण्यासारख्या चौकी पहारा करण्याऱ्या शिपायांच्या जागा आहेत. कोणीं ह्मणतात कीं, वर किल्ल्याचा जो मोठा दरवाजा ( महादरवाजा ) आहे. त्यापेक्षां हा लहान दरवाजा असल्यामुळें लहानाचा अपभ्रंश होऊन नाना दरवाजा असें नांव पडलें असावें! कोणी ह्मणतात कीं, नाना फडनवीसानें बांधला असल्यामुळें त्याचें नांव या दरवाज्यास पडलें असावें. असो, हा नानाचा दरवाजा टाकून पुढें चढत गेलें ह्मणजे तोफखाना लागतो. या तोफखान्यावरील कोणी मुसलमान अधिकारी लढाईंत पडला असल्यामुळें त्याचे नांवाचा एक दर्गा येथें आहे. त्यास मदर्शाचा दर्गा असें ह्मणतात. या ठिकाणीं एक तोफ पडलेली आहे. तिची लांबी ७ फूट व परीघ २॥ फूट आहे. तेथून पुढें चढत गेलें ह्मणजे डोंगरास खोदलेल्या तीन चार कोठड्या लागतात. यांस धान्याचीं कोठारें असें ह्मणतात. परंतु मला वाटतें तसें नसेल कारण इतक्याखालीं व किल्ल्यापासून बऱ्याच दूर अशा ठिकाणीं धान्य ठेवण्याच्या जागा केल्या असतील असें अनुमान करितां येत नाहीं. शिवाय त्या कोठड्यांची जी खोदण्याची तऱ्हा आहे ती पाहिली असतां ज्यांस आपण पांडवांचीं कृत्यें असें ह्मणतों तशा प्रकारच्या त्या

कोठड्या असाव्या असें वाटतें. कोठड्या टाकून पुढें चढत गेलें ह्मणजे अगदीं सरळ उंच चढणीचा रस्ता लागतो. तो रस्ता चढल्यावर महादरवाजा ह्मणजे मोठा दरवाजा दिसूं लागतो. एथून डोंगरास खोदून केलेल्या पायऱ्या महादरवाज्यापर्यंत आहेत; त्या सर्व चढून गेलें ह्मणजे महादरवाज्या समोर आपण जातों. येथें वारा सोसाट्याचा वाहत असून डोंगराचे एके बाजूचा देखावा उत्तम दिसतो. या ठिकाणीं चढून आलेल्या मनुष्यास किंचित् विश्रांति घेतल्या शिवाय पुढें जाववत नाहीं. या महादरवाज्यावर एकेक बुरूज असून दरवाज्याचे दोहों बाजूस सिंव्हानें हत्तीस तोंडांत धरलेलें अशीं चित्रें खोदलेलीं आहेत. या दरवाज्यांतून वर गेल्यावर जें प्रथम डोंगराचें टोंक दृष्टीस पडतें, त्यांस हिरकणीचें टोंक असें ह्मणतात. दुसरे बाजूस जें टोंक दिसतें, त्यास टकमकचें टोंक असें ह्मणतात. दरवाज्यास लांकडी फळ्यांचा दिंडी दरवाजा आहे. दरवाज्याचे आंत जवळ चौकी पाहाऱ्यांच्या कोठड्या ही आहेत. तसेंच पुढें गेलें असतां मैदानांत दोन तोफा पडलेल्या दृष्टीस पडतात. त्यांची लांबी फूट ६ व परीघ फूट ४ अशा आहेत. त्या टाकून पुढें गेलें असतां थोडेसें आणखी मैदानासारखें लागतें. रायगड किल्ला एकंदर ३ टोंकांत आहे. त्या टोंकांचीं नांवें: पहिलें हिरकणीचें टोंक, दुसरें टकमकटोंक व तिसरें भवानीटोंक व चवथें एक लहानसें टोंक आहे, त्यास श्रीगोंदाटोंक असें ह्मणतात. किल्ल्यांत ठिकठिकाणीं

पाण्याच्या सोई करितां टांकीं बांधलेलीं आहेत. त्यांतील पाणी रूचकर असून विपूळ असतें. महादरवाज्यानें तसें- च पुढें गेलें ह्मणजे प्रथम महाराजांचा कसरत करण्याचा लोखंडी मलखांब लागतो. ह्याची उंची ६ फूट आहे. त्याचे जवळ एक मुसलमानी दर्ग्याची स्थापना केलेली आहे. ती कोणी नवीन केलेली आहे असें तेथील कृतीवरून दिसतें. एथून पश्चिमेकडे आलें असतां एक मोठा तलाव कांहींसा वाटोळेआकृतीचा लागतो. त्याचें उत्तरेचें आंग पश्चिमेचे आंगापर्यंत बांधीव आहे. बाकी पूर्वेकडील कांहीं भाग दक्षिणेचे आंगापर्यंत व उत्तरेचें आंग व तसेंच पूर्वेचें आंग ही बांधीव नाहींत ह्मणजे थोडक्यांत सांगितलें तर हा तलाव स्वभावसिद्ध कातळाचाच बनलेला आहे. या तलावास गंगासागर असें ह्मणतात. श्रीछत्रपती शिवाजी महाराज दररोज नेमानें या तलावांत स्नान करीत असत. देवाचे पु- जेसही यांतीलच उदक घेत असत. अशी दंतकथा आहे.

---

* या गंगासागर तलावांतील तीर्थ ( उदक ) मीं एक घागरभर बरोबर आणिलें आहे. * मीं ही दंतकथा ज्या समयीं ऐकिली. त्या समयीं मला केवळ ही अतिशयोक्ति आहेसें वाटलें. परंतु अनुभवांती ती गोष्ट अगदीं खरी आहे. अशी माझी खात्री झाली त्याची हकीकत येणेंप्रमाणें:—

मी डोंगराचा चढाव चढतांना इतका थकलों होतों कीं, मजला एक पाऊल सुद्धां पुढें टाकण्याची शक्ति राहिली नव्हती. दोन चार ठिकाणीं तर मीं सपशेल निजलों देखील

* ही टीप पुढें पान ३८ वर नेणें * असें चुकून आहे तेथें वाचावी.

गंगासागराचे पश्चिमेस अगदीं कांठावर दोन मनोरे अष्टपैलु आकृतीचे आहेत. या मनोऱ्यांवर राजवाड्यांतून येण्याचा परभारें दक्षिणेकडून रस्ता आहे. सांप्रत त्या पैकीं एक मनोरा मोडकळीस आला असून दुसरा कांहींसा बरा आहे. या मनोऱ्यांपैकीं एकांत आह्मी आपल्या भोजनाची व्यवस्था करून दुसऱ्यांत बसण्याची जागा केली होती. गंगासागराचे पूर्वेकडे एक देवळाचा भरटा बराच दूर आहे. त्यांत मूर्ती वगैरे कांहीं नसून तेथील मूर्ती अष्टभुजांची महिषासूरमथनी एके ठिकाणीं पलीकडे बसविलेली दृष्टीस पडते. या देवीस शिरकाबाईचें देऊळ असें ह्मणतात. गंगासागर तलावाचें पाणी फारच मधुर, स्वच्छ, पाचक, असें आहे. हें पाणीं कधीं आटत नाहीं ह्मणून सांगतात. शिवाजी

---

होतों. त्या वेळीं मनांत विचार येत कीं, जर मी असा थकलों आहें तर वर गेल्यावर मजकडून सर्व स्थळें पहाणें होईल तरी कसें ? परंतु काय चमत्कार सांगावा, किल्ला चढून गेल्यावर थोडा उपहार करून गंगासागराचें उदक मात्र प्राशन केलें; तशी मजमध्यें एक प्रकारची नवी उमेद व तरतरी उत्पन्न झाली ! मीच मग आपल्या ठिकाणीं विचार करूं लागलो कीं, जो, मीं अगदीं थकलों होतों, तो असा हुशार कशानें झालों ? मीं जरी अशा प्रकारचें दैवीक चमत्कार मानीत नाहीं, तरी या प्रत्यक्ष अनुभवानें माझें मन गोंधळांत पडून गेलें होतें यांत अगदीं संशय नाहीं.

महाराजांचे मावळे शिपाई मोहीम करून आल्याव
पांच चार दिवस त्यांनीं या तलावाचें पाणी प्राशन केलें
कीं, त्यांचे अंगांत नवीन तरतरी व हुरूप येत अ
अशी दंत कथा *आहे. किल्ल्याचे पश्चिमेस पालखी
दरवाजा लागतो. त्याचेच शेजारीं राण्यांचे रहाण्याचे
महाल ओळीनेंच सात लागतात. त्यांतून एक मेकांत जाण्या-
स रस्ते केलेले दृष्टीस पडतात. या महालांचे डावेबाजूस चौकी
पहारा करणाऱ्या शिपायांच्या राहण्याच्याजागा आहेत. ये-
थून तसेंच पुढें गेलें असतां राजवाड्यांतील स्त्रियांच्या हवा
खाण्याच्या जागा दिसतात. पालखी दरवाज्याचे
आंत जाऊन डावे बाजूस जो रस्ता जातो त्यानें पुढें गेलें
असतां आपण महाराजांचे दरबाराचे जागीं जातों. तेथें
गेल्यावर सिंव्हासनाचे स्थानाकडे पाहिल्याबरोबर
अंगावर रोमांच उभे राहून मनांत अशी बुद्धि उत्पन्न
होते कीं प्रथम नमस्कार करून मग पुढें जावें. मजबरोब-
रावर कांहीं मराठे लोक होते, ते त्या स्थानाकडे एकसार-
खे टक लाऊन पहात कांहीं वेळ उभे राहिले होते. मला
तर त्यास्थळीं गेल्याबरोबर ऐतिहासिक गोष्टी मनांत
येऊन इतकें रडें कोसळलें कीं, तें माझ्यानें कांहीं केल्या
आवरेना! छाती अगदीं भरून आली! असा प्रकार झाला.
हल्लीं सिंव्हासनाची मुख्य जागा कोणी खणून टाकली
आहे. तरी त्या ठिकाणीं गेल्यावर मनास एक प्रकारची
स्थीति प्राप्त होऊन मन अनेक तरंगांनीं गोंधळून जातें.
आसपासचे महारलोक अजून तेथें गेले असतां त्या जंगल
गर्क झालेल्या जागेचें दर्शन दुरून करितात. मजबरोबर

*: पान २६ वरील तळें हीच पद्मतळें.

किल्लयाखालचा रहाणारा एक मुसलमान होता, त्यानें यास्थळीं येतांक्षणींच आपले पायांतील वाहणा काढून टाकल्या आणि आह्मासही तसेंच करण्याविषयीं सांगितलें. नंतर आह्मी सर्वजण त्या स्थानाच्या अगदीं जवळ गेलों. तें स्थान जरी हल्लीं भयानक झालें आहे, तरी ज्या ठिकाणीं सिंव्हासन होतें ती जागा व असपासची रचना जेव्हां दृष्टीस पडते ते समयीं महाराजांच्या शौर्याचें स्मरण होऊन जसें काय ते त्या स्थळीं विराजमान आहेतच असा भास होतो. ( धन्य, वा, शिवबा तूं धन्य आहेस आपल्या आईच्या पोटीं खरा सुपुत्र तूंच एक होय. या आर्यभूमींत खरा आर्य तूंच एक उत्पन्न झालास. हे महा पुरुषा मला तुझें स्मरण झालें ह्मणून तुझे चरणीं माझा नमस्कार असो. ) या दरबार कचेरीचे दोहों बाजूस १५ फूट लांबी रुंदीच्या दोन खोल्या आहेत. त्यांत पूर्वीं खजिना ठेवित असत असें सांगतात. दरबारापुढें बाहेर अंगण्यांत मांडव घालण्याची जागा आहे. त्याच्या खुणा अजून जशाच्या तशाच आहेत. यापलीकडे थोड्याशा अंतरावर धान्याच्या कोठड्या आहेत*; अंग

*या कोठड्यांत सांपत गवत रुजले आहे. वरती छावणी वगैरे कांहीं एक नाहीं. तरी जमिनींत तांदूळ जसेच्या तसेच राहिलेले सांपडतात. हे तांदूळ अगदीं काळे झालेले आहेत, तरी आज दोनशें वर्षे ऊन पाऊस खात असत। जसेच्या तसेच आहेत. हा मोठा चमत्कार आहे. मी आपल्या बराबर सुमार शेरभर तांदूळ गोळा करून आणिले आहेत.

ण्यांतील मांडवापुढें पाण्याचीं दोन टांकीं आहेत. त्या-पलीकडे व दरवाज्याचे अगदीं समोर नगरखाना आहे. या नगरखान्याचे माडीवरून आसपास प्रांतांतील देखावा उत्तम दिसतो. हा नगरखाना १०।११ मैल वरून देखील दिसूं शकतो. किल्ल्याचे समोर आसपास जे डोंगर आहेत, त्या डोंगरांतून रायगडाकडे येण्याच्या ज्या वाटा आहेत त्यांची देखरेख रहावी ह्मणून त्या त्या डोंगरावर रात्रौ दिव्यांच्या खुणाची रचना त्याकाळ असे. या दिव्यांस दररोज एकेक मण तेल लागत असे असें सांगतात. ह्मणजे नगरखान्यावरील दिवा आणि सभोंवारचे डोंगरावरील दिवे, खुणांनीं एकमेकांस अलबेल देत असत; अशी दंतकथा आहे. नगरखान्याची उंची फुटी ९० व रुंदी फुटी ९ आहे. नगरखान्या पलीकडे एक तलाव आहे. त्यास कुशावर्त असें ह्मणतात या अंगचे टोकास गोदाटोक असें ह्मणतात. एथें एक लहानसें महादेवाचें देऊळ आहे. त्यांत लिंग वगैरे कांहीं एक नाहीं. पलीकडे एक कोरडा तलाव आहे व त्या भोंवतालीं मोडक्या इमारती आहेत. तेथें पोतनीस वगैरे अष्ट प्रधान रहात असत, असें सांगतात. पलीकडे एक हौद आहे. त्यांतील पाणी काळेंभोर असल्यामुळें त्यास काळा हौद असें ह्मणतात. नगरखान्याचे उत्तरकडे गेलें ह्मणजे थोडे अंतरावर बाजार लागतो. या बाजारांत दुतर्फा दुकानांचे ओटे ४४ असून ते आज दिवसपर्यंत जसेच्या तसेच आहेत. बाजारांतील रस्ता रुंदी फुटी ४० व लांबी फुटी ७८० आहे. प्रत्येक दुकानाचे ओट्याची

उंची ९ फूट आहे. या दुकानाचे ओट्यांत नागण्याचें दुकान ह्मणून एक जागा दाखवितात. हा व्यापारी मोठा प्रामाणिक व सत्यवादि होता, अशी प्रसिद्धी आहे. राजवाड्याचे उत्तरेस व गंगासागरतलावाचे समोर हत्तीखाना आहे. या हत्तीखान्याची लांबी ९० फूट व रुंदी २० फूट आणि उंची १२ फूट आहे. यांत सुमारें तीन चार हत्ती राहूं शकतील अशा निरनिराळ्या जागा आहेत. बाजाराचे दक्षिणेस होळीचें मैदान ह्मणून जागाआहे. येथून भवानी टोंकाचे अंगास गेलें ह्मणजे शिबंदी लोकांच्या रहाण्याच्या घरांचीं जोतीं ओळीनेंच लागतात. येथेंच त्यांचीं पाणी पिण्याचीं टांकीं आहेत. येथून उत्तर आणि पश्चिम या मधील दिशेनें गेलें असतां शेवटीं जें डोंगराचें टोंक ( कडा ) लागतें. त्यास टकमकचा कडा असें म्हणतात. हा कडा अगदीं सरळ व उतंरता आहे. शिवाजी महराज स्वर्गवासीं झाल्यानंतर संभाजी महाराजांनीं जीं वाईट कृत्यें केलीं त्यांतील एके कृत्याविषयीं हा कडा प्रसिद्ध आहे. तसेंच दुसरे एके भयंकर कृत्याविषयीं राजवाड्यांतील एक भिंत प्रसिद्ध आहे. श्रीछत्रपती शिवाजी महाराजांचे अष्ट प्रधानांपैकीं राजारामाचे पक्षास अनुकुळ असलेल्या एका गृहस्थास संभाजीने या कड्यावरून कडेलोट करून मारून

---

*या व्यापाऱ्यास शेषप्पा असें ही ह्मणत असत. शिवाजी महाराजास राज्याभिषेक झाला, ते समयीं जामदारखान्याचा कारभार याजकडे होता असा ही लेख आढळतो.

टाकलें होतें. त्याचप्रमाणें राजवाड्यांतील एके भिंतींत आपली सापत्न मातोश्री सोयराबाई साहेब यांस जिवंत चिणून टाकलें होतें. दुर्वृत्त राजपुत्र सिंव्हासनावर आले असतां ज्ञानशुन्य होऊन कशीं अनान्वित कृत्यें करितात हें याजवरून आपणास चांगलें समजतें. बाणकवींनें चंद्रापीड राजाला, त्याची सिंव्हासनावर बसण्याची तयारी झाली असतां केलेला उपदेश प्रत्येक राजपुत्रांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. "यौवनं धनसंपत्तिः प्रभूत्वमविवेकता ॥ एकैक मप्य नर्थाय, किमतत्र चतुष्टया" अर्थः—एक गर्भश्रीमंती, दुसरें तारुण्य, तिसरें सौख्य, चवथें प्रभूत्व म्हणजे अधिकार या चारी वस्तूंतील प्रत्येक वस्तु तिचा विवेक रितीनें जर उपयोग केला नाहीं तर केवळ अनर्थाची खाणच होते. मग या चारी वस्तूंचा नियमीतपणा नष्ट होऊन अनियमीत पणानें जर एकत्र झाल्या तर यांचा उपयोग करणाऱ्या राजपुत्राची दशा काय विचारावयाची आहे. मग त्या राजाचे डोळ्यांची आकृति बाह्यता सुरफाटी दिसते मात्र; पण ते डोळे असतात उरफाटलेले. याजमुळें त्यास सर्वत्र उलट दिसतें. सन्मार्ग कुमार्गसा वाटतो. आणि कुमार्ग सन्मार्गसा दिसतो. अशा स्थितींतच मग तो राजा दुःखरुपीं नदीमधे डोहांत बुडून मरण पावतो. तसाच प्रकार संभाजी महाराजांचा झाला. हें आपणास इतिहासावरून चांगलें समजतें

हिरकणी नावांचें टोंक जें पश्चिमेचे अंगास आहे, त्यास हिरकणी ह्मणण्याचें कारण असें आहे कीं, हिरक-

णी नांवाची एक गवळ्याची सून ' पावाड ' गांवची रहाणारी होती. ती दूध विकण्याकरितां रोजच्या प्रमाणें एक दिवस रायगडावर गेली असतां दूध विकून संध्याकाळीं परत येणार तों थोडा उशीर झाल्यामुळें किल्ल्याचे दरवाजे लागून गेले ! यामुळें बापडी मोठे काळजींत पडली. घरीं सासू व नवरा रागावतील ही मनांत भीति तशांत पाळण्यांत तान्हें मुल त्याजकडे चित्त लागून स्तनांत पान्हा फुटून गेला ; अशा स्थितींत असतां तिनें शेवटीं या टोंकाचे अंगास तटावरून एकदम खालीं उडी टाकली. ईश्वर कृपेनें तिला कांहींएक इजा नहोतां सुरक्षीत घरीं जाऊन पोहोंचली. जे समयीं महाराजांसहें कळलें तेसमयीं महाराजांनीं तिजला पतीसह बोलावून आणून दोघांस अलंकारभूषणें दिलीं. त्या वेळापासून या टोंकास हिरकणीचें टोंक असें नांव ठेविलें* बाजाराचे बाजूस

---

* रायगडाखालीं छत्री निजामपूर म्हणून एक गांव आहे या गांवास छत्री निजामपूर म्हणण्याचें कारण असें आहे कीं एके समयीं शिवाजी महाराज किल्ल्याबाहेर फिरत असतां एकाएकीं डोक्यावर छत्री धरणारा खिजमतगार वाऱ्याचे सोसाट्योंन असा उडाला कीं तसाच खालीं निजामपुरीं छत्री सुद्धां उतरला ! त्या वेळीं महाराजांनीं या गांवास छत्रीनिजामपूर असें म्हटलें. ज्या जागीं तो खिजमतगार उतरला होता, त्याचे स्मरणार्थ तेथें निशाण पुरलें तें निशाण गांवकरीलोक आजदिवसपर्यंत तसेंच चालवीत आहेत.

ब्राह्मण वस्तीचीं घरें आहेत. तेथेंच त्यांचे पाणी भरण्याचे हौद आहेत. तेथून तसेंच पुढें गेलें ह्मणजे एक उंच महादेवाचें देवालय लागतें. यास जगदिश्वराचें देऊळ असें ह्मणतात. या देवळाचे तटाचे आंत मागचे दरवाज्यानें शिरतांना वाटेवर एक मारुतीची भव्य मूर्ती पडलेली दृष्टीस पडते. या मारुतीचें अवसान मोठें मनोवेधक असून मूर्ती आतांच घडून तयार केली आहे कीं काय? असा भास होतो. देवळाचे तटबंदीची लांबी १९० फूट व रुंदी १९० फूट व उंची १० फूट; उत्तर दक्षिण भागाचे कोपऱ्यांची उंची ४० फूट; तटाचे आंत जाण्यास पश्चिमेचा दरवाजा आहे, त्याची उंची ६ फूट व रुंदी ४ फूट; पूर्वेकडे बाहेर पडण्याचा महादरवाजा आहे त्याची उंची ८ फूट, कमानीची रुंदी ९ फूट, दरवाज्यावरील चौघड्यासुद्धां एकंदर उंची २९ फूट आहे. खुद्द जगदीश्वराचे देवळाची लांबी फूट ३९ रुंदी फूट २९ व उंची फूट १८ आहे. देवळाचे दक्षिणेस व उत्तरेस लहान, लहान, दरवाजे आहेत. त्या प्रत्येकाची लांबी फूट ४ रुंदी फूट २॥ प्रमाणें आहे. देवळांतील शिवलिंगाचा कोणीं दुष्टानें उच्छेद करून टाकला आहे. गाभाऱ्यांत पाणी व चिखल सर्वकाळ सांचलेला असतो! आतां तें स्थान वडवाघळे, पाकोळ्या, यांचें वस्तीस्थळ असून त्यांची विष्टा सर्वकाळ पडल्यामुळें तेथें दुर्गंधी येत असते! शिव! शिव!! ज्या देवळाची शिवाजी महाराजांनीं स्थापना केली त्याची ही दशा असावी आणि आम्ही ती तशीच राहूं द्यावीना!!! देवळाचे मध्यभागीं जेथें

कांसव अमावयाचें तेथील चिरे उखळले आहेत व कांसव नाहींसें करून टाकलें आहे. देवळावरील घुमट पाहिला असतां तो अगदीं ताबुतासारखा दिसतो. म्हणजे घुमटाचे चारी कोंपऱ्यांस चार कळस असून मध्यें मोठा घुमट आहे. दुरून पाहिलें असतां अगदीं मशिदीसारखा भास होतो. देवळापुढील अंगणांत भव्य नंदी आहे. त्याची शिंगें वगैरे मोडून फोडून टाकलेलीं आहेत. देवळीचे तटाचे महादरवाज्यांतून बाहेर पडलें असतां आपण शिवाजी महाराजांचे समाधीपाशीं येतो. येथें उजेव हाताकडे दरवाज्याचे भिंतीवर शिळालेख खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

॥ प्रासादो जगदीश्वरस्य जगता मानंदरोऽनुज्ञया ॥
॥ श्रीमछत्रपतेः शिवस्यनृपतेः सिंव्हासने तिष्टतः ॥
॥ शाके शाण्णव बाणभूमि गणना दानन्द संवत्सरे ॥
॥ ज्योतीराज मुहुर्त कीर्ति महिते शुक्लेश सार्पेतिथौ १
॥ वापी, कूप, तडाग, वाजि, रुचि रम्यं वनं वीतिके॥
॥ स्तंभैः कुंभि गृहे नरेंद्र सदनै रंभ्रंलिहैर्मीहिते ॥
॥ श्रीमद्रायगिरौ गिरण्म विषये हो राजिना निर्मिते॥
॥ यावच्चंद्र दिवाकरौ विलसत स्तावत्समुज्जृंभते ॥२॥

# समाधीचे जीर्णोध्धारा विषयीं प्रार्थना.

ही सर्व रायगड संबंधी हकीगत तुम्हांसर्वांपुढें सांगण्याचा हेतु असा आहे कीं, ज्या श्रीछत्रपती शिवाजी महाराजांस आपण या आर्यभूमीचे मायबाप समजतों, व ज्यांचें स्मरण झालें असतां मोठे प्रेमानें त्यांच्या ठिकाणीं पूज्य भाव ठेवितों, ज्या पराक्रमी पुरुषानें हिंदु हें नांव राखिलें, ज्यांनीं आमचे गळ्यांतील जानव्याचें रक्षण केलें, इतकेंच नाहीं तर ज्यांनीं आमची शेंडी मुंडणारांची कुंदी सुद्धां काढिली! त्या महायोध्याची, मोडलेली, छिन्न भिन्न झालेली असे स्थितींतील समाधी रायगडावर श्री जगादेश्वराचे देवळा पुढें आहे, असें मीं वर सांगितलेंच आहे. तिजवर सांप्रत छावणी वगैरे कांहीं एक नाहीं! तिचे चिरे उखळून कोणी दुष्टानें टाकले आहेत. त्या खालीं पोकळींत मृत्तिका मिश्रित रक्षा जशीच्या तशीच पडलेली आहे. समाधीवर केर, कचरा, व झाडांचा पाला पडून कुजलेला असतो. उन्हाळ्यांत ऊन, पावसाळ्यांत पाऊस आणि सीतकाळीं थंडी! त्याच प्रमाणें शिवाजी महाराज रायगडीं राज्य करीत होते, ते समयीं नेमानें ज्या शिवलिंगाची नित्य पूजा करीत असत ज्याचें दर्शन घेतल्या शिवाय अन्न घेत नसत असें जें आमच्या छत्रपती शिवाजी महाराजांनीं स्थापिलेलें श्री

जगदिश्वरांचें देऊळ, त्यांत सांप्रत सर्व काळ चिखल सांचलेला असतो. हर, हर, केवढी ही दुःखद स्थीति तरी ! ! कोठवर वर्णन करावी ?

अहो, ज्या वीराविषयीं आम्ही मोठाले सभांत, भाषणांत, अभिमान बाळगून बोलत असतों कीं, तो वीर पुरुष आमच्या महाराष्ट्र देशांत व आमचे मराठ्यांचे कुळांत उत्पन्न झाला होता. अशा महायोध्याच्या समाधीची व त्यांनीं स्थापिलेल्या देवळाचीही दुःखद स्थीति कानांनीं आह्मी ऐकावी! आणि स्वस्थ बसावेना? मला वाटतें कीं, खरे मराठ्यांस तर हें कधीं सहन होणार नाहीं.

मी रायगडावर गेलों आणि महाराजांचे समाधीची व देवळाची ही स्थीति ज्या समयीं डोळ्यांनीं पाहिली त्या समयीं माझे अंगावर रोमांच उभे राहून मनास जी एक प्रकारची उदासिनता प्राप्त झाली ती येथें सांगतां येत नाहीं. माझी विचारशक्ति स्तब्ध होऊन घटकाभर मी त्या महापुरुषाचे समाधी पुढें डोळे मिटून बसलों. थोडे वेळानें मनांत विचार आला कीं, किती तरी आह्मी हिंदु अनुपकारी ? ज्या पुरुषाचे पायांपुढें हिंदुस्थानांतील सर्व हिंदुराजांनीं आपले मुगूट नमवावे, अशी ज्याची योग्यता! त्याच्या समाधीची ही अशी दशा असावीना? आणि त्या विषयीं आह्मी हिंदु राजांनीं कांहींच करूंनये. एकूण मेल्यामागें कोणी कोणाचा नाहीं "शितें आहेत तोंपर्यंत भोंवतालीं भुतें आहेत." असें साधुजन ह्मणतात तें खरें आहे.

अहो, सर्व जनहो; अहो, आर्यबांधवहो, अहो हिंदुस्था
त्रे राजेहो त्या प्रतापी शिवाजी महाराजांचे आपल्या [illegible]
वर किती उपकार झाले आहेत. त्यांचे आपल्या [illegible]
नांत स्मरण करा. त्या उपकारांची फेड करण्यांत [illegible]
सर्वस्व जरी खर्ची घातलें तरी आपण त्या महापुरुषाचे ऋणांतून मुक्त होणार नाहीं. ही गोष्ट खरी आहे कीं नाहीं याचा विचारकरा.

सन १८५७ सालीं जर नानासाहेब पेशव्यांनीं तलवार हातीं घेतली नसती तर आजपर्यंत डाल हौशीचे होम कुंडांत सर्व नेटीव राज्यें पडून जळून भस्म झालीं असती कीं, नाही! ही गोष्ट ज्या प्रमाणें निर्विवाद आहे. त्याच प्रमाणें श्रीछत्रपती शिवाजी महाराजांनीं क्षात्र धर्माचें व्रत धारण केलें नसतें तर त्या वेळीं अवरंगजेबाचे तडाक्यांतून सुटून एका तरी हिंदूचें संस्थान आज नांव घेण्यास शिल्लक राहिलें असतें काय? तेव्हां असे प्रकारचे ज्याचे उपकार आमच्यावर झाले आहेत. त्याचे उतराई अशा कृतीने आम्ही व्हावें काय? थोडक्यांत सांगितलें तर आमच्या शरिराचें चामडें काढून त्याचा जोडा शिवून जरी आह्मी त्याचे पायांत घातला असता तरी देखील पूर्ण उतराई झालों नसतों इतकें आह्मी ऋणी आहों.

खरोखर आणि प्रांजल बुद्धीनें जर विचार केला तर स्वातंत्र्य म्हणजे काय व त्याचा खरा उपयोग कसा करावा. हा धडा जर आम्ही महाराष्ट्र जन थोडासा शिकलों असतों तर तो शिकविणारे आमचे मूळ

गुरू ते शिवाजी महाराजच होत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत मराठी राज्याचा वृक्ष कोणी लावला हे विचार मनांत आणले तर त्या वृक्षाचें बीजारोपण करणारे ही ते शिवाजी महाराजच होत. हें अगदीं निर्विवाद आहे. कारण त्या वेळीं तो वृक्ष त्यांनीं लाविला म्हणूनच पुढें त्या वृक्षास पहिले बाजीरावासारखीं, महादजी शिंद्यांसारखीं, पिलाजीराव गायकवाडासारखीं, मल्हारराव होळकरासारखीं, शूर व गुणवान् फळें आलीं. त्या फळाचे पुढें मोठमोठे वृक्ष होऊन त्यांचीं बीजें सांप्रत हिंदुस्थानांत, गुजराथेंत, माळव्यांत, व दक्षिणेंत धनरूप जलानें टवटवी पावलेलीं नांदत आहेत. हें आपण पाहतों त्यांस ही महाराजांचे समाधीची दुःखद स्थिति ऐकून खंती वाटूं नये काय? मला वाटतें खचित् वाटावी. व वाटेल, यांत अगदीं संशय नाहीं. त्या महापुरुषाचे समाधीची सुश्रूषा ठेवणें हें राजेरजवाड्यांचें एकल्याचेंच नुसतें कर्तव्य आहे असें नाहीं तर प्रत्येक गरीब स्थितींतील हिंदूचें देखील हें कर्तव्य आहे आणि यांत विशेषेंकरून प्रत्येक महाराष्ट्रीय मनुष्याचें तर अगदीं पहिलें कर्तव्य आहे हें जगाला ठाऊक आहे. यांत जर आह्माकडून हेळसांड झाली तर मात्र आह्मासारखे पापी, आह्मासारखे अनुपकारी, आह्मासारखे कृतघ्न कोणी नाहींत, असा दोषारोप जगांतील सर्व ज्ञाते लोक व इतिहासकार आह्मावर करतील तो घेण्यास आह्मीं तयार नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री आहे. एका इंग्रजी ग्रंथकारानें या विषयीं हिंदु-

लोकांस दोष दिला आहे. तो आपले पुस्तकांत ह्मणतोः-

No man now cares for Shivaji over all those wide dominions which once owned him Lord and Master, acquired by so much blood and treasure and which he handed down with care to the Rajas of Kolapur, the Bhouslas of Satara and their Peshwas in Poona, not one man now contributes a Rupee to keep or repair the Tomb and temple of the founder of the Maratta Empire.

Book of Bombay.

तर मग असा प्रश्न सहज उत्पन्न होतो कीं, ही दुःखद स्थिति आजपर्यंत आह्मी राहूं दिली कशी? तर त्याचें कारण मला असें वाटतें कीं, महाराजांचे समाधीची व त्यांनीं स्थापिलेल्या शिवलिंगाची जी सांप्रत दैन्यदशा झाली आहे, तिचे संबंधानें खरी हकीगत राजेरजवाडे व मोठमोठाले लोकांपुढें आजपर्यंत कोणी ठेविली नव्हती, यामुळें असें होऊन गेलें. बाकी ही हकीगत जर लोकांस व राजेरजवाडे यांस कळती तर त्याज बाबद योग्ययत्न केल्याशिवाय कधीं राहिले नसते अशी माझी समजूत आहे. बरें, चला जें होऊन गेलें तें कांहीं मागें येत नाहीं. आतां तरी आपण त्याजविषयीं योग्य विचार करूं ह्मणजे आपलें सर्वांचे कर्तव्यकर्म केलें असें होईल.

आतांच मीं रायगडावर जाऊन आलों व तेथें मीं माझे डोळ्यांनीं जी खरी स्थिति पाहिली त्याजवरून ही हकीगत पुस्तकरूपानें लिहून आपल्या सर्वांपुढें ठेवीत

आहे. तेव्हां आतां ही जर आह्मासर्वांकडून योग्य यत्न होऊन समाधीची दुरुस्ती झाली नाहीं तर मात्र सरते-शेवटीं इतकेंच सांगतों कीं, धारातिर्थात स्नानें करून अ-खंड स्वर्गीं वासकरीत असलेले आमचे पूर्वज आमच्या अशा या दुरवर्तनाकडे पाहून आह्मास काय ह्मणतील व त्यांचे मनास यापासून किती दुःख होईल याचा तरी विचार सर्वांनीं करावा. इतकीच शेवटील सर्वांस प्रार्थना करून हा विषय आटोपता घेतों.

---

## समाधीचे जीर्णोद्धाराविषयीं कविता

॥ ज्यानें यावन सैन्य मर्दुनि सुखी केलें मराठे जना ॥
॥ ज्याची शौर्य पराक्रम स्मृति महा आनंद देई मना ॥
॥ ज्यानें कष्टवुनी स्वकीय तनुते सद्धर्म संरक्षिला ॥
॥ जो गोब्राह्मण दीन पालक असा विद्वज्जनीं गाइला॥ १ ॥
॥ शिक्षा नष्टा दुष्टा करुनि रणिं शिक्षा निज करीं ॥
॥ शिखा सूत्रांचें जो अवन अमुचा भूपति करी ॥
॥ नृपाची त्या ऐशा शिव! शिव! विभग्ना निरखुनी ॥
॥ समाधी हो आधीं लवहि तुपजे सज्जन मनीं ॥ २ ॥
॥ महाराष्ट्रीं ज्यानें निज जन सु सत्ता बसविली ॥

॥ अह्मां स्वातंत्र्याची अभिरुचि जयानें कळविली ॥
॥ नृपाची त्या भग्ना शिव! शिव! समाधी निरखितां ॥
॥ मराठ्यांच्या चित्तीं नुपजत कशी हो विषमता ॥ ३ ॥
॥ शिवाची समाधी अहा भग्न व्हावी ॥
॥ अह्माला कशी लाज त्याची नसावी ॥
॥ स्वदेशाभिमानी सदां जे मराठे ॥
॥ कुठें गुंतलें झोंप घेतात वाटे ॥ ४ ॥
॥ शिवा! विष्टा! क्लिष्टा शिव शिव समाधी तववसे ॥
॥ मराठ्यांच्या कष्टा उपजवि मनीं वृत्त न कसें ॥
॥ जयांच्या सौख्यार्थं प्रति दिनि तुझा देह रिजला ॥
॥ समाधीचा त्यांतें विसर नकळे केवि पडला ॥ ५ ॥
॥ पर द्वीपस्थांचे स्फटिक मय ओंतीव पुतळे ॥
॥ कराया दावाया परजंनि निजौदार्य सगळे ॥
॥ तुह्मी देतां वित्ता स्वजन करण्या स्मारक पहा ॥
॥ शिवाजीचे व्हावी निजमनिन बुद्धी अहहा ! ! ॥ ६ ॥
॥ देश प्रीती प्रखर विलसे ज्याचि या त्प्रदेशीं ॥
॥ माहीं कींया स्वजन असला एकही आर्य देशीं ॥
॥ नव्हे, नव्हे, बहुत असती आर्य देशाभिमानीं ॥
॥ गेला त्यांच्या मजगमतसे हा न वृत्तांत कानीं ॥ ७ ॥
॥ शिंदे गायकवाड होळकर हो राजे मराठे अहो ॥
॥ तुम्ही सुज्ञ जरी तरी निजमनीं तुम्हा नकां दुःखहो ॥
॥ श्रीमच्छत्रपती मठ स्थिति अहा पाहोनि ऐकोनंवा ॥
॥ वाटे दुःख जरी तरी मठ नवा बांधा वरा वाहवा ॥८॥
॥ हे श्रीमत्करवीर भूप जनका हे वीर वंशोद्भवा ॥
॥ रक्षूनी निजमातुलेय मठता जोडा जगीं वाहावा ॥

॥ श्रीमच्छत्रपती शिवाजि नृपती नाहीं तुझा पारका ॥
॥ सांगावें नलगे तुम्हास मग मीं कीं सद्गुणा पारखा॥९॥
॥ देशासाठीं त्यजतिल सुखें प्राणही संकटीं जे ॥
॥ वीरश्रीची सुरु चिरकला यन्मुखाब्जीं विराजे ॥
॥ नाहीं ऐसे निजजनि तरी आदरायास पात्र ॥
॥ शूरातें या बहुत असती भारती आर्य पुत्र ॥ १० ॥
॥ ह्या लागी हे नरपति अतां भूप जेथें मराठे ॥
॥ ठिंण्यागालीं वसति असती वित्तसंपन्न मोठे ॥
॥ जाई तेथें कथुनि अपुलें वृत्त त्यातें नृपाळा ॥
॥ प्रार्थी त्याकी नरपति अहो क्षात्र धर्मास पाळा ॥११॥
॥ ते मानितील गमतें मजला विनंती ॥
॥ प्रेमे तुझी नृपातिकां मग होशि खंती ॥
॥ धिक्कारतील तरिते तुजला शिवाजी ॥
॥ मागे फिरे स्वमनिं मानुनि त्यास पाजी ॥ १२ ॥
॥ जाई त्वरें पुढति पुण्यपुरींत राया ॥
॥ तेथें बहुत असति तुज आदराया ॥
॥ विद्वान् सुबुद्धि निजदेश हिताभिमानी ॥
॥ त्याच्या स्वदुःख अवघें मग घाल कानीं ॥ १३ ॥
॥ ते मानितील गमतें मजला विनंती ॥
॥ रायातुझी, तुजासि देतिल सौख्य अंतिं ॥
॥ होई असें न जरी येइ इथें पुनः तूं ॥
॥ ठेवूं नंको निजमनां तिळमात्र किन्तू ॥ १४ ॥
॥ प्रेमाश्रूनीं सकृदपि सख्या सिंचुनी त्वत्समाधी ॥
॥ चंडांशूच्या प्रखर किरणीं जाहलेली दुराधी ॥
॥ आनंदानें हरिन अवघी वंदुनी पाद पद्म ॥

॥ सद्भावानें विरचिन तिथें मीं तुला पर्णसद्म ॥ १५ ॥
॥ जाई जाई तरी मग अतां जायवेगें कृपाळा ॥
॥ भेटे प्रेमें कडकडुनियां आप्तवर्गा नृपाळा ॥
॥ पाहूनीया स्वजन तुजला फार होतील तुष्ट ॥
॥ आनंदानें करतिल तुझें आदरें ते अभिष्ठ ॥ १६ ॥

समाधिशातावली.

ज्या वेळीं महाराज समाधिस्त झाले ते समयीं त्यांचे खजिन्यांत द्रव्य होतें, त्याचा तपशील येणें प्रमाणें. खुद्द महाराजांचे शिक्क्याचे रोख रुपये नऊ कोट होते. सोनें एकावन हजारतोळे होतें. माणकें व पाच वगैरे दोनशें तोळे होतें मोत्यें पांचशें तोळे,व हिरे दोनशें तोळे होते.

---

## शिवाजी महाराजांचे वेळची रीतभात

मोहिमीवर जातांना तोफा वगैरे बरोबर नेण्याचा प्रघात नसे. मुख्य करामत वेळोवेळीं काम करण्यांत व चपळपणांत असे. मावळे लोकांत हा मोठा गुण असे कीं, ते धन्याची आज्ञा ती देवाची आज्ञा मानीत असत आणि ती अमलांत आणण्यांत जिवाकडे सुद्धां ते अगदीं पहात नसत. असे प्रकारें वागणें हें एक प्रकारचें ते

आपणास भूषण मानीत; ते कधीं आपल्या धन्या जवळ खोटें बोलत नसत. व असें करणें मोठें पाप आहे, अशी त्यांची समजूत होती. शिवाजी महाराज आज येथें तर उद्यां कोठें असतील याचा अदमास शत्रूस करिता येत नसे. याचें कारणही हेंच होय. मराठ्यांचा दरारा मोंगल लोकांस इतका असे कीं, जर त्यांचा घोडा पाणी पीत नसेल तर थट्टेनें त्यास ते विचारीत कीं, " तुला मराठा पाण्यांत दिसतो कीं काय? " याचप्रमाणें बंगाल्याकडे लहान मुलांस ( जसें आपण आपल्या मुलांस बाउ आला बाउ आला, असें सांगतों. तसें ) " मराठा आला, मराठा आला, " असें मुलगें रडत असेल तर सांगण्याचा प्रघात अजून आहे. अशी आमची जिकडे तिकडे कीर्ति व दरारा होता. ती आतां आमच्यांतून कोठें गेली हें मात्र कळत नाहीं.

---

## अन्न.

शिवाजी महाराजांचे वेळेस साधारण मराठ्यांचें दररोजचें जेवण ह्मटलें ह्मणजे खिचडी, व त्यांत शेवटीं शिजतांना तूप घालीत असत; हें अन्न, आणि तोंडीं लावण्यास मिर्च्यांची चटणी असली ह्मणजे त्यांचा निर्वाह होत असे. (गुजराथेंत व माळव्यांत मराठ्यांस थट्टेनें " चटणी खाऊ " असें ह्मणण्याचा प्रघात आहे. तो यावरूनच पडला असावा असें वाटतें. ) मांसाचा उपयोग ते फार थोडे वेळीं ह्मणजे सणावारीं मात्र करीत असत. ते दारू पीत

असत. दारू विषयीं शिवाजी महाराजांची सर्व राज्यांत सक्त मनाई असे. पाश्चिमात्याकडून अलीकडे विद्येचे पूर हिंदुस्थानांत वाहत आल्यावाबद्द पुष्कळ विद्वान लोक मोठमोठाल्या सभांतून त्यांची स्तुति करितात ते खुशाल करोत. परंतु विद्येचे पुरा मागें मद्याचे पूर त्यांनीं आणून या भरत भूमींत सोडले आहेत. त्यांत आमचे नवीन विद्वान् पुष्कळ बुडून मरत आहेत. या त्यांच्या दुष्ट वर्तनाविषयीं त्यांची कोणी निंदा करीत नाहीं! ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

---

## पोषाख.

शिवाजी महाराजांचे वेळेस मावळे व हेटकरी लोकांचा पोषाख ह्मटला ह्मणजे डोकीस रुमाल किंवा वेडें वांकडें पागोटें असे. मावळे लोक बहुत करून पागोटें घालीत. आणि हेटकरी लोक रुमाल बांधीत. नेसण्यास गुडघ्या पर्यंत धोतर, पायांत वहाणा अंगांत बंडी, कंबरेस धोतर व त्याचे वर दारूनें भरलेलें तें चामड्याचें तोस्तान असे. खांद्यावर घोंगडी व तिजवरच टाकलेली तोड्याची बंदूक किंवा बगलेंत लटकती तलवार असा पोषाख असे. रात्रीं निजण्यास हंतरूण ह्मटलें ह्मणजे तें कंबरेचें धोतर व पांघरण्यास तीं घोंगडी, असली ह्मणजे झाला आमच्या शूर शिपायाचा बिच्छाना, या सुखशय्येवर सर्वकाळ सोबतीस निजणारी त्याची मैत्रीण ती बंदूक अथवा तलवार होय. तिचे सोबतीनें हे शूर

शिपाई रानांत वनांत पाहिजे तेथें सुखानें निद्रा घेत अ-
सत. ज्या प्रमाणें ही जिवाची मैत्रीण सर्वकाळ त्याचे
जिवाचें रक्षण करीत असे. त्या प्रमाणें दुसरी वर सांगि-
तलेली मैत्रिण त्याचे बरोबर असे ती त्याचे ~~निमाने~~ र-
क्षण करी ती कोणती विचाराल कर त्याची ती घोंगडी
होय. ती पर्जन्यकाळीं पावसा पासून त्याचे रक्षण करी.
इतकेंच नव्हे तर थंडीचे दिवसांत पुन्हा त्याचे अंगांत
उबारा आणण्यास ही तीच उपयोगीं पडत असे, या
प्रमाणें साधे स्थितींत छत्रपती शिवाजी महाराजांचे शि-
पाई रहात असत. याजमुळें पाहिजे त्या ठिकाणीं पाहिजे
त्या वेळीं धन्याची आज्ञा झाली असतां त्यांची जाण्याची
अगदीं एके पायावर तयारी असे. या अशा अगदीं
साधारण स्थितींतील शिपायांनीं देखील निवळ आपले
शौर्याचे बळानें आणि पुन्हा कितीएक प्रसंगी तर का-
ळोख्याराात्रीं सुद्धा मोठमोठाल्या डोंगराच्या दरडी चढून
पुरंदरा सारखे, सिंव्हगडा सारखे, प्रतापगडा सारखे, मं-
जबूत किल्ले सरकरून आमचे हवालीं केले! तेव्हां
धन्य ते शिपाई होत. या एकंदर वर्णनावरून आपल्यास
असें दिसतें कीं मनुष्याची किमत कांहीं बाहेरच्या पो-
षाखावर किंवा डामडौलावर नाहीं तर त्याची खरी
किंमत अंतर्यामचे गुणावर असते. कितीएक पुरुष आपण
बाहेरून पाहिलें तर राजासारखे मोठे उमराव राजासार-
खे शोभायमान दिसतात. परंतु त्यांचीं मनें पाहिलीं तर
अनीतीनें भरलेलीं, आत्मस्वार्थी भित्रीं अशीं असतात.
परंतु कितीएक पुरुष बाहेरून पाहिलें तर अगदीं साधे

स्थितींत कंगाल दशेंत दृष्टीस पडतात. परंतु त्यांचीं मनें पाहिलीं तर राजासारखीं उदार, परोपकारी व देशा करितां प्राण देणारीं अशीं असतात. तशा योग्यतेचे शिवाजी महाराजांचे शिपाइ होते.

---

# शिवाजी महाराजां विषयीं दोन गोष्टी.

महाराजांनीं ज्यासमयीं कल्याण सर केलें. त्या समयीं त्यांचे एके सरदारास तारुण्य आणि सौंदर्य या गुणांनीं मंडीत अशी एक यवनी सांपडली; खरे स्वामीभक्त असतात त्यांचें असें वर्तन असतें कीं, त्यांस जर कांहीं चांगली वस्तु सांपडली तर ते आपल्या धन्यास मोठे प्रेमानें अर्पण करितात. त्या प्रमाणें ही यवनी महाराजांस देण्याचें मनांत आणून त्या सरदारानें विनंती केली. तेव्हां महाराजांनीं तीस समक्ष हजर करण्याविषयीं आज्ञा केली. नंतर ती आल्यावर तिचे चेहऱ्याकडे पाहून महाराजांनीं तिचे लावण्याची तारीफ करून हंसून ह्मणाले कीं, जर इजसारख्या आमच्या मातोश्री असत्या तर मी ही रुपवान् झालों असतों! नंतर तिचे नवऱ्याचा शोध करून तिला चोळी, लुगडें, देऊन त्याजकडे पाठवून दिली.

---

## गोष्ट दुसरी.

अवरंगजेबानें दिल्लीरखानाबरोबर तरूण व उत्तम स्वरूपवान् अशी एक स्त्री पाठवून दिली होती. तिज मार्फत दिल्लीरखानानें संभाजी महाराजांस मोहित करून आपल्या लष्करांत घेतलें. कांहीं काळानें ही सर्व हकीगत महाराजांस समजली तेव्हां दिल्लीरखानाची खोडकी मोडण्याकरितां एके सरदारांस महाराजांनीं त्याजवर पांठविलें. त्या सरदारानीं दिल्लीरखानांस एके अडचणीचे जागीं गाठून त्याच्याशीं सामना केला. या समयीं दिल्लीरखानानें संभाजीस पुढें लढण्यास उभें केलें असतां मराठे सरदारांस विचार पडला कीं, आतां कसें करावें ? महाराजांस ही सर्व हकीगत विदीत करतांच महाराजांनीं तत्काळ उत्तर दिलें कीं, जरीं संभाजी माझा पुत्र आहे तरी लढाईत त्याच्यावर गोळी टाकण्यांत तिळमात्र अंतर करूंनका; कारण जर तो मराठ्यास सोडून शत्रूस मिळाला आहे. तर तो मराठाही नव्हे आणि माझा पुत्रही नव्हे. तो आपल्या सर्वांचा शत्रु समजावयाचा. याजकरितां गोळी टाकण्यांत अगदीं अंतर करूं नका. या लढाईत दिल्लीरखानाचा पराभव होऊन संभाजी महाराजांस परत आणलें आणि पन्हाळ किल्ल्यावर नजर कैदेंत ठेविलें. ते तेथें शिवाजी महाराजांचा अंत होईपर्यंत होते.

**समाप्त.**

# छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचे कारकिर्दींतल्या कांहीं गोष्टींचें टिपण

१५४९ शक, विजयनाम संवत्सरे शिवाजी महाराजांचा जन्म झाला.

१५७० शक, सर्वधारीनाम संवत्सरे श्रावण वद्य १ रोजीं शाहाजी महाराजांस धरून विजापुरकरांनीं अटकेंत टाकलें.

१५७७ शक, मन्मथनामसंवत्सरे पौष वद्य १४ रोजीं जावळी घेतली.

१५७९ शक, हेवलंबीनाम संवत्सरे चैत्र वद्य १० बेदर घेतली. पुढें ज्येष्ट शुद्ध १२ संभाजी महाराजांचा जन्मझाला.

१५८१ शक, वितारीनाम संवत्सरे आश्वीन शुद्ध ७ अफझुलखान यास मारिलें आणि पौष मासीं रुस्तुमजखानाचा मोडकेला व माघमासीं विजापुरकराशीं सामना केला.*

---

*शिवाजी महाराज अफझुलखानाशीं एकांत करण्यास बसले ते समयीं तंबूबाहेर दरवाज्यासमोर आपआपल्या धन्याचे शरीरावर नजर ठेवून दोहों पक्षाकडे ( बॉडी-गार्ड ) उभे होते अफझुलखानाचे अंगास सय्यदबंडा नांवाचा त्याचा नोकर उभा होता आणि शिवाजी महाराजां

१५८२ शक, शारवरीनाम संवत्सरे जेष्ट शु० ८रोजीं शाहिस्तेखानास मारिलें व मार्गशीर्ष मासीं सुरत शहरावर स्वारीकेली. पुढें माघमासीं शु० ५ रोजीं शिवाजी महाराजांचे वडील शहाजी महाराज स्वर्गवासी झाले.

१५८७ शक, विश्वासुनाम संवत्सरे जयशींग व दिल्लीरखान यांच्या भेटी झाल्या व चैत्र शु० १ चे मुहुर्तानें महाराजांची स्वारी दिल्लीस गेली.

---

चे अंगास जिऊमहाल व संभाजी कावजी असे दोघे होते. पुढें संधी पाहून अफझुलखानानें प्रथम महाराजांस पकडून खालीं पाडण्याचा यत्न केला. इतक्यांत महाराजांनीं वाघनखे अफझुलखानाचे पोटांत खुपसली तसा सय्यद बंडा आंत धावून आला आणि तलवारीचावार महाराजांवर करण्यास हातउचलणार इतक्यांत जीऊमहाल यानें त्याचा तो तलवारीचा हात सबंद आपले तलवारीनें उतरून टाकला आणि दोघांमध्यें आपण झाला. नंतर संभाजी कावजीनें सय्यदबंड्याची कतल केली आणि महाराजांनीं अफझुलखानावर भवानीचा उपयोग केला. सांप्रत अफझुलखानाची कबर प्रतापगडानजीक सदर ठिकाणीं आहे. दरसाल मात्र महिन्यांत प्रतापगडावर वार्षिकउत्साह होतो ते समयीं महाराजांची प्रतिमा पालखींत बसवून अफझुलखानाचे कबरीपर्यंत आणतात. ज्या समयीं अफझुलखान प्रतापगडाशीं शिवाजी महाराजांबरोबर लढण्यास आला ते समयीं शिवाजी महाराज पुरंधरावर होते. नंतर एकमेकाचे भेटी विषयीं करारमदार होऊन स्थळाची,

१५९१ शक, सौम्यनाम संवत्सरे माघ व० ९ सिंहगड घेतला व पुढें फाल्गुनांत पुरंदर घेतला.

१५९२ शक, साधारणनामसंवत्सरे ज्येष्ट व० ४ लोहगड घेतला व पुढें निंदोळाकर्नाळा व माहुली घेतली.

१५९५ शक, प्रमाथीनाम संवत्सरे चैत्र व० १० रोजीं परळी घेतली व श्रावण व० ९ रोजीं सातारा

---

भेटीच्या दिवसाची योजना झाल्यावर भेटीचे पूर्वदिवशीं संध्याकाळीं महाराज पुरंदराहून निघून प्रातःकाळापूर्वीं अश्वीन शुद्ध ७ मीस प्रतापगडीं दाखल झाले. पुरंधर आणि प्रतापगड याजमध्यें अंतर ३० कोस आहे. व मोठमोठाले डोंगर दरी व उतरण्या लागतात. रावबहादूर गोपाळराव हरी देशमुख ज्यामार्गानें शिवाजी महाराज प्रतापगडावर गेले होते त्या मार्गाने मुद्दाम गेले; तेव्हां त्यास जाण्यास चार दिवस लागले. हा सर्व प्रवास शिवाजी महाराजांनीं एक रात्रींत केला आणि अफझुलखानाशीं सामन्यास सिद्ध झाले. ह्याच्या पूर्वीं प्रतापगडावर शिवाजी महाराजांशीं मसलती ज्या झाल्या त्या सर्व बनवलेल्या शिवाजी महाराजांबरोबर झाल्या! निश्चय ठरल्याबरोबर खरे शिवाजी महाराज दाखल झाले! या हकीकती वरून किती कर्तबगारी व काळजी ठेवावी लागत असे हें आपणास समजतें. प्रतापगड संस्थानाकडे वार्षीक नेमणूक ४००० चार हजारांचीं गांवें देऊन महाराजांनीं चालविली आहे. परंतु नवल म्हणून इतकेंच कीं अशा महापुरुषाचे समाधीची सुश्रुषा मात्र आह्मी त्याचे मागें ठेवित नाहीं.

घेतला आणि आश्वीन शु० १३ दशीस पांडवगड घेतला.

१५९६ शक, आनंदनाम संवत्सरे ज्येष्ट शु० ४ मंदवार श्री छत्रपति शिवाजी महाराजांची मुंज झाली व ज्येष्ट शु० १३रोजीं राज्याभिषेक झाला. नंतर ज्येष्ट व० ९ रोजीं शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई साहेब स्वर्गवासी झाल्या. पुढें माघमासीं व० ५ रोजीं संभाजी महाराजांचा वृतबंध झाला.

१६०१ शक, या सालांत बहादुरबिंडा घेतला व वैशाखमासीं भूपाळगड घेतला. फाल्गुनांत गुजर यांचे कन्ये बरोबर राजाराम महाराजांचें लग्न झालें.

. १६०२ शक, रौद्रनामसंवत्सरे चैत्र शु० १५ रविवार रोजीं छत्रपति शिवाजी महाराज स्वर्गवासी झाले पुढें वैशाख व० १३रोजीं रायगडावर धराधरी झाली व आषाढ शु० ११रोजीं शिवाजी महाराजांची पत्नी सौ० पुतळाबाई सतीगेल्यां.

---

*चैत्र शुद्ध १५ शके १६०२ रोजीं शिवाजी महाराज स्वर्गवासी झाले पुढें आषाढ शु० ११ रोजीं त्यांची पत्नी पुतळाबाई सतीगेल्या हा सती जाण्याचा योग वाचकांस चमत्कारीक वाटेल तर असें होण्याचें कारण असें दिसतें कीं खरे शिवाजी महाराज मेल्याची बातमी पुतळाबाई माहेरी असल्यामुळें व अशाच दुसऱ्या कारणामुळे बरोबर समजली नसावी. शिवाजी महाराजांनीं मोंगलांचें कापट्य न चालूं देण्याकरितां आपल्या सारखे दहा पांच शिवाजी

१६१६ शक, भावलनाम संवत्सरे संभाजी त्याचा दुष्टमसलती कलुशा* हे दिल्लीरखानाकडून धरले गेले. पुढें माघ शु० ५रोजीं राजाराम यास रायगड येथें रामचंद्र पंत आमात्य व परशुराम त्रिंबक प्रतिनिधी या कारभाऱ्यांनीं राज्याभिषेक केला

---

करून त्यांचे तैनातीस फौजफाटा देऊन किल्यावरून ठिकठिकाणीं स्थापिले होते! तेंव्हां खरे शिवाजी महाराजच मेले त्याची पक्की खात्री होण्यास इतका काळ गेला व पुढें महाराजांच्या अस्थी॰बरोबर हीबाई सती गेली. ग्रांटडफनें हिंदुस्थानचे इतिहासांत असें लिहिलें आहे कीं इस्टइंडिया कंपनीच्या मुंबईच्या गव्हर्नरास शिवाजीमहाराजांच्या मरणाच्याइतक्या वेळां खबरा आल्या आहेत कीं शेवटीं त्यानीं असा निश्चय केला होता कीं जोंपर्यंत शिवाजीचीं कृत्यें नाहींशी झालीं नाहींत तोंपर्यंत शिवाजी मेलासा मानितां येणार नाहीं. ह्यावरून त्यावेळीं शिवाजी मरून कितीदां जिवत होत असेल हें आपणास चांगलें समजतें. मावळे लोकांत अशी समजूत आहे कीं शिवाजी महाराजांस भवानी प्रसन्न होती ती त्यास धन देत असे व पुन: जिवंत करित असे यासमजूतीसही हेंच कारण असावें.

*कलुशा हा कनोज ब्राह्मण होता.त्याची आणि संभाजीची ओळख मथुरेची. अवरंगजेबाच्ये गुप्तकारस्थानानें कलुशा मराठ्याचे मराठ मोळयांत ह्मणजे संभाजीचे अगदीं अंत:पुरापर्यंत पोहोंचला होता. शिवाची महाराज जिवत होते तोंपर्यंत या॰दुष्टाचे बीजबाहेर पडलें नाहीं. महाराज

१६२० शके बहुधानामसंवत्सरें जेष्टमासीं राजाराम साहेब स्वर्गवासी झाले त्यास राधाबाई व राजसबाई अ-

---

स्वर्गवासी होतांच कलुशाचे कपट संगतीचे फल उघड उघड दिसूं लागलें: कारण संभाजीला शिवाजीचे वेळचे सर्व कारभाऱ्यांचा तिटकारा येऊं लागला [ बामण दरबारांत लै शिरले आहेत ] त्यांस हकून दिल्याशिवाय राज्याचा चांगला बंदोबस्त होणार नाहीं असे उद्गार तो आपले मंडळींत काढूं लागला [ नागेशराव विनायक बापट यांनीं संभाजी ह्मणून जें पुस्तक केलें आहे त्यांत रामदास स्वामीनीं उपदेशपर ह्मणून जो कागद पाठविला होता, त्याचे उत्तर संभाजीनीं दिलेलें वाचलें ह्मणजे या गोष्टी चांगल्या समजतात ] कोणतेही परके देशांतील लोक दुसरे देशांत सत्ता करूं लागले ह्मणजे त्यांचीं जीं अनेक दुष्ट कारस्थानें असतात त्यांत पहिलें कृत्य असें असतें कीं त्या जिंकिलेल्या देशांतील पुढारी व राज्यकारणी लोकांचा जो वर्ग असेल त्यास नाहींसें करून टाकावयाचें. त्याशिवाय त्यांचा मतलब साधत नाहीं. तोच प्रकार कलुशाचे हातून आवरंगजेबानें येथें घडविला.

रोमनलोक जेंव्हां [ ब्रीटानियांत ] गेले तेंव्हां त्यांनीं अनेक कुलांगडी करून "आलफ्रेडदीग्रेट" व त्याचे पक्षाचे जे राजकारणी लोक होते त्यांची निःपांडवी होईल ते उपाय सोधूं लागले. याचा परिणाम येथपर्यंत झाला कीं, बापड्या आलफ्रेडास व त्याचे साथ्यास शेवटीं वनवास स्वीकारावा

शा दोन स्त्रीया होत्या. पहिली पासून शिवाजी व दुसरी पासून संभाजी असे दोन पुत्र झाले होते.

---

लागला होता. महाराष्ट्र देशांतील लोकांत असे तंटे आलीकडे सुरू झाले आहेत कीं काय ? हा प्रश्न समजूतदार पुढारी लोकांनी विचार करण्यासारखा आहे.

---

# रायगड येथील एकंदर दुरुस्ती बाबद व तेथें नित्य म्हणजे शाश्वत खर्च असावयाचा त्याचा तपशील.

## Rough Estimate of the probable cost of erecting a Chhatree over the Burning place of the late Chhatrapati Shiwaji Maharaj at Raigad.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6800 | cft | Foundation masonry rubble stone and lime with excavation........ | 28 | .. | .. | 100 cft. | 1904 |
| 6250 | cft | Plinth masonry of rubble stone and lime .................. | 29 | .. | .. | .. | 1812 |
| 1068 | cft. | Cut stone facing to plinth........ | 2 | 8 | .. | cft. | 2670 |
| 21000 | cft. | Rubble masonry in superstructure | 30 | .. | .. | 100 cft. | 6300 |
| 7600 | cft. | Cut stone facing including cornice brackets &c.................. | 3 | .. | .. | 1 cft. | 222400 |
| 320 | cft. | Carved columns with moulded bases and carved caps................ | 5 | .. | .. | each | 1600 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1110 | cft. | Stone work of small and bing domes eaternally.................... | 4 | .. | .. | 1 cft. | 4440 |
| 6000 | cft. | Brick arch in domes and plaster inside.................... | 50 | .. | .. | 100 cft. | 3000 |
| 650 | cft. | Chunam plaster................ | 8 | .. | .. | 100 cft. | 502 |

गोविंदराव बाबाजी जोशी पब्लिक
लेक्चरर यांजकरितां तयार केलें.

Total Rupees— 45046

K. Janardon. Enger.
Archititect.

# रायगड येथें नित्य खर्च असावयाचा तो.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी व श्री जगदीश्वर महादेवाचें मंदीर रायगडा वर आहे त्या मंदिराकडे व समाधी कडे महिने महा जो खर्च असावयाचा त्याचा तपशील. हा खर्च सांप्रत बडोदें येथें श्रीमंत कैलास वासी सयाजी राव महाराज गायकवाड यांचे नावानें स्थापिलेल्या श्री सर्वेश्वर महादेवाचे संस्थाना कडे जसा खर्च होत आहे त्या सुमारानें अदमास केला आहे.

| अनुक्रमनंबर | तपशील. | महिने महा रक्कम | वार्षीक रक्कम | |
|---|---|---|---|---|
| १ | पुजेकडे सामान दरमहा लागतें त्याची किंमत........ | ८ | ९० | |
| २ | महा नैवेद्याकडे दरमहा.............................. | २० | २४६ | |
| ३ | नंदादीप श्री जगदीश्वर महादेवाचे देवळांत व श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे समाधी पुढें तुपाचा व तेलाचा दीप मिळून दरमहा.......................... | ३५ | ४२० | |
| ४ | संस्थानाकडील नोकर लोकांचा पगार दरमहा....... | १५७ | १८८४ | २५५० |

## श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी रायगड येथें आहे तीजवर छत्री बांधावयाची त्याचा अदमास.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६८००० | घ.फू. | पाया खोदून दगड चुन्यानीं भरणें. | २८ | १०० | ,, | १९०४ |
| ६२५० | ,, | दगड व चुना ह्याचें जोतें | २९ | ,, | ,, | १८१२ |
| १०६८ | ,, | जोत्यास दर्शनी पुढचे बाजूस घडीव दगड बसवणें | २ | ८ | घनफूट ॥/ | २६७० |
| २१००० | ,, | जोत्याचे वरील बांधकाम | ३० | १०० | ३०० | ६३०० |
| ७६०० | ,, | पुढचे बाजूस झुकता घाटवार कंगोरा ब्राकेट वगैरे | ३ | ,, | घनफूट | २२८०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३२० | ,, | घाटदार दगडी उथळीं आणि खांबावरील तोंडलीं व कोरींव खांब वगैरे | ५ | ,, | ग[illegible]स १ | १६०० |
| १११० | ,, | लहान व मोठे घुमुटाचें बाहेरील दगडी काम | ४ | ,, | घनफूट १ | ४४४० |
| ६००० | ,, | घुमुटांत वीट व चुन्याची कमान व आंतील बाजूस ङास्तर | ५० | ,, | घनफूट १०० | ३००० |
| ६५०० | ,, | चुन्याच्चें ङास्तर | ८ | ,, | घनफुट १०० | ५२० |
| | | | | | | ४५०४६ |

## रायगड येथें एकवार खर्च व्हावयाचा तो.

" पाचाड " गांवाहून रायगड किल्यावर जाण्याचा जो रस्ता आहे त्याची
दुरुस्ती करणें व रायगडा वरील श्री छत्रपति शिवाजी महाराज
यांचेसमाधीची दुरुस्ती करणें व समाधी वर छत्री
बांधणें व श्री जगदीश्वर महादेवाचे देवळाचा
घुमट मोडकळीस आला आहे त्याची
दुरुस्ती करणें या एकंदर
खर्चाचा अदमास.

| अनुक्रमनंबर | तपशील. | रक्कम. | एकंदर |
| --- | --- | --- | --- |
| १ | पाचाड गांवा पासून किल्याचे महादरवाज्या पर्यंत जाण्याची जी हल्लीं पाउल वाट आहे तिची लांबी सुमारें ६ मैल आहे या वाटेची दुरुस्ती घोड्यावरबसून किंवा मेण्यांतून जातां येईल इतकी करणें व ठिकठिकाणां मोठमोठाल्या दरी पडल्या आहेत त्यांत भरणी टाकणें. | ६००० | |
| २ | श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचें समाधीवर आलाहिदा नकाशांत दाखविल्या प्रमाणें छत्री बांधणें | ४५०४६ | |
| ३ | जगदीश्वर महादेवाचे देवळाची दुरुस्ती करणें वगैरे | ५००० | ५६०४६ |

# माझे समजुतीप्रमाणें आणखी तेथें सोई असाव्या त्या.

१ रायगड किल्याचे आसपास चांगले कुलवान मराठे पुष्कळ राहतात त्यांस थोडेंसें तरी सहाय्य व्हावें असे विचार मनांत आणले असतां रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचे नावानें धर्मार्थ दवाखाना स्थापावा.

२ रायगड किल्ला जंगलांत व डोंगरावर असल्यामुळें ज्या लोकांचे मनांत छत्रपति शिवाजी महाराजांच्या समाधीचे दर्शनास जाण्याचें येतें त्यांस शिधा सामोग्री वगैरे सर्व सामान घेऊन इतके लांब जावें लागतें, ही अडचण दूर व्हावी, व लोकांचे वळण रायगडावर जाण्याचें पडावें असे विचार मनांत आणले असतां त्या ठिकाणीं महाराजांचे नांवाचें अन्नछत्र असावें व त्या छत्रांतून कोणतेही जातीचा मनुष्य आला असतां त्यास एकवार भोजन मिळत जावें अशी व्यवस्था असावी.

## शेवटील प्रार्थना !!

यांत मी जी व्यवस्था लिहिली आहे, ती सर्व होण्यास साधन जितकें द्रव्य पाहिजे तितकें एकत्र होऊन हें कार्य शेवटास जाईल कीं नाहीं हे विचार म-

नांत आणले असतां मन अगदीं उदासीन होतें, कीं इतकें मोठें कृत्य शेवटास जाईल कसें? पण मागील कितीयेक पुरुषांच्या यत्नाकडे पाहिलें असतां मनास एक प्रकारची हिम्मत येते. मुंबईस सेंट जेवियर नांवाचें एक स्कूल आहे त्याची उत्पत्ती अशी आहे कीं सेंट जेवियर नांवाचा एक मनुष्य होता, त्यानें असा निश्चय केला कीं प्रत्येक खिस्ती मनुष्यापासून एकवार एक आणा वर्गणी घ्यावयाची. याप्रमाणें पृथ्वीवर जेवढे ख्रीस्ती धर्माचे लोक होते त्या त्या सर्वांकडून वर्गणी घेऊन एकत्र केली. ती रकम इतकी मोठी झाली कीं, त्या रकमेंतून एक लाख रुपयांची मोठी इमारत मुंबई येथें सेंटजेवीयरचे इंग्लिश स्कुलाकारितां बांधलेली आहे; व बाकी राहिलेल्या रकमेचे व्याजांत हल्लीं दरमहा पंधराशें रुपये पर्यंतचा खर्च चालतो. . . .

अमदाबादेस कांहीं मंदिरें अशीं आहेत कीं, तीं भीक मागणाऱ्या गोसाव्यांनीं बांधलेलीं आहेत. ह्मणजे त्यांनीं गांवोंगांव भीक मागून पैसा एकत्र करून पन्नास पन्नास साठ साठ हजार रुपयांचीं मंदिरें बांधिलीं आहेत.

आमच्या छत्रपति शिवाजी महाराज यांचे पायांपाशीं प्रेम नाहीं असा एकही हिंदु सांपडणार नाहीं; इतकेंच नाहीं अजून पुष्कळ हिंदु राजे असे आहेत कीं, ते शिवाजी महाराजांचे श्रमाची योग्यता व त्यांणीं या भरत भूमीची जी सेवा केली त्याची खरी किंमत जाणणारे आहेत. हिंदुस्थानांत राजांचे दरबारांत जे भाटलोक गीतें गात असतात त्यांत एक गीत असें आहे कीं—

"जो न होत सिवाजी, तो सुन्नत होत सबहुनकी"

ह्मणजे जर शिवाजी महाराज उत्पन्न झाले नसते तर सर्वांच्या सुनता झाल्या असत्या. असें गीत गातात तें कांहीं खोटें नाहीं. तर असे प्रकारें ज्याणें या देशाची सेवा केली आहे त्याचे समाधीचें योग्य रक्षण करण्यांत सर्व लोक आपला उदार हस्त मोठे प्रेमळ बुद्धीनें पुढें करतील अशी पूर्ण आशा आहे.

बडोदें.
ता. १ माहे जुलै
सन १८८५

आपला
अति नम्र सेवक
**गोविंदराव बाबाजी जोशी.**
वसईकर.

शिवाजी महाराज मराठे लोकांस उपदेश करीत असत त्यापैकीं कांहीं कविता लिहून त्या महापुरुषानें आज्ञाकारितां कसे यत्न चालविले होते त्याचें आपणास स्मरण देतों.

अहो सर्व योद्धे रणशूर वीर ॥ हो राव गाजी रण रंगधीर ॥
रण प्रसंगी लढणार शूर ॥ चुकेनसे नेम अचूक फार ॥१॥
पडे देह ज्याचा रणीं, स्वर्ग त्याला ॥
मिळे सत्य आहे स्मरा त्या गीतेला ॥
स्वदेश स्वभार्या पराधीन होता ॥
पडे रौरवीं कूळ. माझी सुनता ॥ २ ॥
जेव्हां टळे हें परचक्र मोठें ॥
तेव्हां खरे हे ठरती मराठे ॥
हा देश होईल निवांत थंड ॥
हा शत्रू जातांची हटेल बंड ॥ ३ ॥

राजा शिवाजी